# प्रकरण तिसरे

# बेरड समुदायाची पार्श्वभूमी

# प्रकरण तिसरे
# बेरड समुदायाची पार्श्वभूमी

## प्रस्तावना :

"बेरड समाजाचा ज्ञात इतिहास थेट इ.स.१३३० मध्ये च्या विजयनगर साम्राज्याच्या इतिहासाशी भिडतो. हरिहर आणि बुक्कराय पैकी बुक्कराय हा बेरड समाजाचा होता. त्याची राणी मुखांविका ही श्रावणकोरच्या दोराईस्वामी या बेरड जमातीतील व्यक्तिची मुलगी होती. इ.स.१३३० ते १६६५ इतका प्रदीर्घ काळ विजयनगर बेरड घराण्यातील वीरपुरूषच राज्य करीत होते. कृष्णदेवराय हा राजा बेरड जमातीचाच होता. त्याच्याच काळात विजयनगर राज्याचा परमोत्कर्ष साधला गेला होता. दक्षिण भारतात बेरडांची ३६ संस्थाने होती."[१] शहाजी महाराजांचा सारा कालखंड कर्नाटकात गेला. त्यांचे संपूर्ण सैन्य बेरडांचेच होते. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनात पेरलेल्या स्वराज्याच्या स्वप्नाची प्रेरणा विजयनगरच्या साम्राज्यातूनच प्राप्त केलेली होती. शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यातील अत्यंत महत्त्वाचे हेरखाते बेरड समाजाच्या वहिर्जी नाईकने सांभाळले होते. स्वत:चा जीव जोखमीत घालून आग्रा येथून सुटका करून घेण्यात शिवाजी महाराजांना सहाय्य करणारा फिरोजी फर्जंद बेरडच होता. पेशवाईचा अस्त झाल्यानंतर इंग्रजी अमलात एकामागून एक संस्थाने खालसा होऊ लागली. महाराष्ट्रात असलेल्या संस्थानिकांच्या सैन्यात बहुतांशी सैनिक बेरड रामोशी समाजाचेच होते. त्यांच्यावर वेकारीची कुऱ्हाड कोसळली. कित्तूरची राणी चेन्नम्मा हिने बेरडांच्या वतीने ब्रिटिशांशी नेटाने झुंज दिली. याच काळात हा समाज जंगलवासी झाला. ब्रिटिशांवर छापे घालण्याच्या कामामुळे त्याच्यावर दरोडेखोरीचा शिक्का बसला. उमाजी नाईक यांच्या नेतृत्त्वाखाली रामोशांचे बंड झाले. क्रांतीवीर वासुदेव वळवंताची फौजही रामोश्यांचीच होती.

"१८५७ च्या बंडामध्ये सूरपूर संस्थानचा अधिपती व्यंकटाप्पा नाईक यांनी ब्रिटिश सत्तेविरूद्ध जोरदार लढा दिला. यामध्ये त्यांना हौतात्म्य पत्करावे लागले. १८५८ मध्ये हलगलीच्या शूर बेरड समाजाने इंग्रजाविरूद्ध युद्ध पुकारले. त्यात शेकडो लोकांनी बलिदान

दिले. कित्तूर संस्थानच्या स्वातंत्र्यलढ्यात बेळगाव जिल्ह्यातील हजारो बेरड समाजातील युवकांनी बलिदान दिले. संगोळी रायण्णा यांना चंदगड येथे १८३० मध्ये फाशी देण्यात आली. त्यांच्यासोबत सूतकट्टीचे यल्लाप्पा नाईक, मल्लाप्पा नाईक, बाळप्पा नाईक, करीसिद्धाप्पा नाईक अशा ११ जणांना फाशी दिले."[२] हुक्केरी तालूक्यातील चिकलदिनी येथील गुडदाप्पा हा बेरड समाजाचा सरदार होता. त्याने सुद्धा इंग्रजाविरूद्ध लढा दिला. चिकलदिनी येथे बांधण्यात आलेला किल्लेवजा वाडा आजही साक्षीदार आहे. सिंधूर लक्ष्मण यांनी इंग्रजाविरूद्ध केलेली युद्धे तर सर्वश्रूत आहेत. बेळगाव तालुक्यातील हुदलीजवळच्या डोंगरातील हळ्ळीयुर गावचा कालेरी शिवाप्पा हा त्या काळात कर्नाटकचा वाघ म्हणून लौकिक मिळविलेले गंगाधरराव देशपांडे यांचा प्रमुख साथीदार होता. कालेरी शिवाप्पाला पकडण्यासाठी ब्रिटिशांनी हळ्ळीयुरच्या डोंगरात कित्येक महिने तळ ठोकला होता. इंग्रजी फौजांच्या सोयीसाठी १९३८ मध्ये इंग्रजांनी खोदलेली विहिर त्या डोंगर परिसरात एकमेव आहे. ती विहिर क्रांतिकारकांच्या लढ्याची साक्ष आहे.

१८५७ च्या स्वातंत्र्यसमरातही हा समाज त्वेषाने लढला. त्यामुळे ब्रिटिश शासनाची वक्रदृष्टी त्याच्यावर वळली. डोंगरदऱ्यांचा आश्रय आणि दारू गाळणे-चोरी-दरोडेखोरी हे त्यांचे उपजीविकेचे साधन बनले. या लढाऊ जमातीचा बंदोबस्त करण्याच्या कुटील हेतूने समाजातील पुरूषांना दिवसातून तीनदा पोलीस ठाण्यावर हजेरी देण्याची सक्ती लागू केली होती ती थेट १९५७ पर्यंत चालू होती. सेटलमेंटमध्ये हा समाज अन्य भटक्या जमातींच्या बरोबर बंदिस्त झाला होता.[३]

दुर्दैवाची बाब म्हणजे स्वातंत्र्यानंतरही रामोशी बेरडांची अवहेलना आणि भटक्या बांधवांची विवंचना चालूच राहिली. म. फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दलित मुक्तिच्या लढ्याचीही व्याप्ती भटक्या समाजापर्यंत पोचू शकली नाही. पारधी, कैकाडी, गोंधळी, वडार, कोलाटी, डोंबारी, बेरड, रामोशी यासारख्या असंख्य भटक्या जमातींमधील बांधवांना कोणी वाली उरला नाही. झुंजार, लढाऊ, धर्मनिष्ठ असलेला हा समाज रानावनात-दऱ्याखोऱ्यातच भटकत राहिला. स्वातंत्र्याचे, समृद्धीचे वारे त्याच्यापर्यंत पोहोचलेच नाही.

"बेरड म्हणजे कधी न रडणारा, बेडर म्हणजे कोणाला न भिणारा परंतु कर्नाटक, महाराष्ट्र सीमेलगत असणाऱ्या डोंगराळ भागातील बेरडांची परिस्थिती नेमकी याऊलट होती. पोलिस खात्याचे अमानुष अत्याचार हे त्यांच्या जन्मापासूनच चिकटून आलेले होते. तसेच इतर प्रस्थापितांचे शोषण आणि गुलामगिरी इतकी भयानक की, या भागातील बेरडांच्या डोळ्यात सदासर्वदा भीती होती. पोलिसांच्या अत्याचारामुळे संपूर्ण डोंगराळ भाग बेरडांच्या आक्रोशाने सतत घुमत असायचा त्यांचे जीवन म्हणजे पोलिस स्टेशन, कोर्ट आणि तुरूंग याच दुर्दैवी चक्रातच फिरून संपून जायचं. लोकांना मूळात नैसर्गिक मरण असं येतच नव्हतं."[४]

"दलितांच्या वाट्याला केवळ अस्पृश्यता होती. परंतु बेरडांना सहसा कोणी जवळच करायाचा नाही. माणूस म्हणून जगण्याचा त्यांना हक्कच नव्हता. बेळगाव, हुक्केरी तालुका तसेच निपाणी, अथणी या भागात असलेल्या डोंगराळ भागात केवळ बेरडांच्याच वस्त्या होत्या. त्या डोंगराळ भागात दगड धोंड्याशिवाय दुसरे काही नाही. प्यायला पाणी नाही मग आंघोळ कशाची? पावसात भिजले तीच त्यांची आंघोळ पोटाचे प्रश्न तर याहून भयानक होते. दुसऱ्याच्या शेतातील पीके कापून आणणे तसेच दुसऱ्या भागातील जनावरे चोरून आणणे व ती कापून खाणे हीच बेरडांची जगण्याची साधने. तसेच काहीजण हातभट्ट्यांची दारू काढणे आणि विकणे असे करायचे. परंतु दारू विकण्यापेक्षा काढलेली दारू आपणच पिऊन इतरांशी भांडणे काढून धिंगाणा घालायचे. तसेच काही दुसऱ्याचे खून करण्यासाठी सुपारी घेत असायचे. डोंगराळ भागातील बेरडांमध्ये जी जातपंचायत होती ती तर कोणेतेही निमित्त पुढे करून सर्वसामान्य बेरडांना त्रास द्यायची आणि त्यांना दंड बांधायची. दंड दिला नाही तर त्यांची भयानक मारपीट करायची आणि त्यांची घरे आगीने पेटवून सोडायची. डोंगराळ भागात 'बळी तो कान पिळी' असं चालायचं असे हे डोंगराळ भागात आदिमानवासारखे बेरडांचे जीवन होते.[५]

"ज्या दिवशी सत्याग्रही लोकांवर पोलीसांचे लाठी हल्ले होत असायचे. ते दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात ठळकपणे छापून यायचे. ते वाचून लोक हळहळायचे परंतु डोंगराळ भागातील बेरडांवर होणारे पोलीसांचे अमानुष अत्याचार, त्या अत्याचारामुळे बळी पडणारी बेरड

माणसं याबद्दल शहरातील लोकांना काहीच वाटायचं नाही. उलट या वेरडांना असेच गोळ्या घालून मारले पाहिजे, असे जो तो रागारागाने म्हणायचा. त्यांच्या दृष्टीने वेरड माणसं मूळात माणूसच नव्हते."[६]

## ३.१ बेरड :

"वेरड एक जमात आहे. वेरड लोक आपणास नाईकमक्कळू म्हणजे नाईकांची मुले असे म्हणतात. त्यांना नाइकवाडी, तलवार आणि वाल्मिक अशीही नावे आहेत. त्यापैंकी पहिले व तिसरे नाव रामोशांस ही आहे. वेरड व रामोशी हयांचा धंदाही एकच आहे. शिवाय दोघांतही हळगे नावाचा पोटभेद आहे. या सर्व गोष्टींवरून वेरड आणि रामोशी मुळ एक असून पुढे भाषा व वास्तव्य यामुळे त्यांच्या दोन जाती झाल्या असे दिसते.[१०] प्रदेशपरत्वे या लोकांना बेडर, नाइकवाडी व्याडेरू, तलवारू, नाइकम, काटक इ. नावेही आहेत. यांची मुख्य वस्ती बेळगाव, धारवाड, विजापूर व कोकण या भागात आहे."[७]

बेरड लोक वाल्मीकी मुनीला आपला जातभाई मानतात व स्वत:ला वाल्मीकी असे म्हणवून घेतात. कुठे कुठे ते स्वत:ला रामोशीही म्हणवतात. यावरून मुळात रामोशी व वेरड एकच असावे, पण पुढे त्यांची राहण्याची ठिकाणे व भाषा वेगळी झाल्यामुळे या दोन भिन्न-भिन्न जाती मानण्यात येऊ लागल्या असाव्या. तेलगू वोया आणि तमिळ वेदान हे ही शिकारी असून पूर्वी ते सैन्यात होते व नंतर दरोडेखोर वनले. कन्नय्य या नायन्मारापासून हे आपली उत्पत्ती मानतात. मुंवई राज्यातील वेरडही कन्नय्य हा आपला मूळ पुरूष मानतात.

"इकन्नय हा शिकारी असून शिवाचा परम भक्त होता. त्यांच्या भक्तीने शिवपार्वती त्याच्यावर प्रसन्न झाले. आपण व आपले वंशज हे अचूक शरसंधान करणारे व्हावेत व आपल्या आणि आपल्या वंशजांच्या जमिनीत विशेष कष्ट न करता व फारसे पाणी न लागता धान्य पिकावे असे दोन वर त्याने मागितले. शिवाने ते त्याला दिले. सर्व वेरड हे अचूक नेमबाजी करण्यात पटाईत असून ते पशुपक्ष्यांची शिकार करतात. ते कमी मेहनत व कमी पाणी लागणारे रब्वी पीक तेवढे काढतात."[८]

बुचॅननंच्यां मते वनवासीचे कदंब हे बेरड होते. द.कानडा मधील बेरड फार क्रूर होते आणि त्यांना खुनी असेच म्हणत असत. विजयनगरच्या पाडावानंतर या बेरडांनी अनेक दिवसांपर्यंत त्यांची लूटमार चालवली होती. धन्याशी किंवा प्रमुखाशी एकनिष्ठ राहण्याची त्यांची वृत्ती पाहून हैदर अलीने त्यांच्यातल्या बऱ्याच लोकांना मुसलमान बनविले व त्यांच्या अनेक फलटणी बनविल्या.

पेशव्यांच्या काळात बेळगावजवळच्या चिकोडी येथे बेरडांचे केंद्र होते. इ.स.१८१७ च्या सुमारास नाईक नामक प्रमुखाच्या हाताखाली त्यांची मोठी संघटना होती. त्यावेळी त्यांनी इंग्रजाविरूद्ध बंडाळी केली; पण इंग्रजांनी तिचा बिमोड करून टाकला. पुढे इ.स. १८२९ व १८९५ या वर्षीही त्यांनी इंग्रजाविरूद्ध मोठा उठाव केला होता; पण त्यातही त्यांना अपयश आले.

## ३.१.१ बेरड लोकांची चेहरापट्टी व वेशभूषा :

"बेरड लोक रंगाने काळे व मध्यम उंचीचे असतात. त्यांचा चेहरा गोल, ओठ पातळ, नाक रूंद व केस लांब किंवा कुरळे असून त्यांच्या गालांची हाडे वर आलेली असतात. बेरड पुरूष धोतर किंवा विजार, कोट किंवा उपरणे व वहाणा किंवा बूट असा पोशाख करतात. बरेचसे पुरूष केस वाढवतात. ते कमरेत साखळी, हातात सोन्याचे किंवा चांदीचे कडे आणि कानात सुवर्णवलये घालतात. स्त्रिया विकच्छ साडी नेसतात व डोक्यावरून पदर घेतात. त्या वाळी, टीका, कमरपट्टा, नथ, कर्णफुले, बांगड्या इ. अलंकार घालतात."[९]

## ३.१.२ बेरड जमातीचा व्यवसाय :

पूर्वी हे लोक चोर व दरोडेखोर म्हणून प्रसिद्ध होते. अजूनही त्यांच्यापैकी काही लोक चोऱ्या करतातच. पण आता पुष्कळसे लोक शेती करतात. काही वतनदार व पाटील असून त्यांना जमिनी मिळालेल्या आहेत. काही पहारेकरी म्हणून काम करतात. सांप्रत त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार झालेला असून ते शिक्षक, पोलिस, पट्टेवाले अशा नोकऱ्या करतात.

बेरड लोक कुरव, कव्वलिगर, वक्कल इ. आपल्यापेक्षा श्रेष्ठ जातीचे लोक आपल्या जातीत समाविष्ट करून घेतात. पुरूष असेल तर प्रथम त्याची हजामत करून त्याला स्नान

घालतात. नंतर रूईची जळती काडी त्याच्या जिभेला लावतात. त्यांचे पूर्वीचे क्रिया कर्म जाळल्याचे ते सूचक असते. नंतर ज्ञातिभोजन घालतात. नव्याने जातीत घेतलेल्या पुरूषांना मल्लव पोट जातीत घालतात व स्त्रियांना गुज्जल पोटजातीत घालतात. नव्या लोकांना दिक्षा द्यायची म्हणजे गवताची एक झोपडी करून ती जाळतात. त्याचे नवे जीवन सुरू झाले. असा त्याचा अर्थ होतो.

"बेरड लोकांत नाईकमक्कलू, वाल्मीक किंवा खुद्द बेरड भिल्ल किंवा किरात बिले किंवा हलगे, जस, नस, म्यास कवलेट्टू, ककरमुंडी किंवा हेसी आणि करे किंवा दुर्गा मुर्गी असे पोटभेद असून त्यांच्यात परस्पर लग्नसंबंध होतात. बेरड लोकांत अनेक बेडगू असून, एकाच बेडगूत विवाह होत नाहीत. हे लोक भ्रष्ट कन्नड भाषा बोलतात. सोलापूर जिल्ह्यातील बेरड इतरांशी मराठी व घरात स्वत:ची एक बोली बोलतात. याचे तंटेबखेडे 'कट्टिमणी' हा जात प्रमुख सोडवतो पूर्वी व्यभिचार किंवा कनिष्ठ जातीतील लोकांबरोबर भोजन करणे अशा गुन्ह्यांबद्दल स्त्रीला जातिबहिष्कृत करीत व तिला पुन्हा जातीत घेण्यापूर्वी तिचे मुंडण करीत. पण हल्ली तिचे फक्त पाच केस कापतात व रूईची जळती काडी तिच्या जिभेला लावतात मग तिला थोडी दारू प्यायला देतात. कारण दारूने शरीर शुद्ध होते अशी त्यांची समजूत आहे. पुरूषाला अशाच गुन्ह्याबद्दल गुरूसमक्ष दाढी, मिशा व शेंडी काढावी लागते. गार पाण्याने स्नान करावे लागते व दारू प्यावी लागते."[१०]

## ३.१.३ बेरड जमातीमधील विवाहप्रथा :

मुलामुलींची लग्ने बहुधा लहान वयात होतात. मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. वधूपित्याला देज द्यावे लागते. दोन्ही पक्षांना हा संबंध पसंत असल्यास साखरपुडा होतो. त्या वेळी गावातील अधिकारी आणि लिंगायत पुरोहित उपस्थित असतात. यानंतर एक किंवा दोन वर्षांनी लग्न करतात. विवाहमुहूर्त ज्योतिषी काढून देतो. लग्न मुलाच्या घरी होते. विवाहाच्या आधी दोन दिवस वधूपक्षाकडील लोक वरगृही जातात. त्या दिवशी वधू-वरांना हळद लावून स्नान घालतात. नंतर वधू-वर घरातल्या देवांना नमस्कार करतात. दुसऱ्या दिवशी पाच विवाहित पुरूष गावाबाहेर रानात जाऊन दोन खांब घेऊन गावाच्या हद्दीवर किंवा

मारूतीच्या देवळात येतात. तिथे एक सुवासिनी त्यांना आरती ओवाळते. तिथून ते मिरवणुकीने वरगृही येतात. नंतर ते खांब घरासमोर पुरून त्यावर मांडव घालतात. त्याच दिवशी कुंभाराकडून काही गाडगी, मडकी मिरवीत आणतात. एका मडक्यात दोन काटक्यांना दोन विड्याची पाने बांधून ठेवतात त्यांना रामबाण असे म्हणतात. तिसऱ्या दिवशी वधू-वर बैलावर बसून गावातील मारूतीच्या मंदिरात नमस्काराला जातात. मग वर जात्याच्या तळीवर वधू धान्य भरलेल्या टोपलीत उभी राहते. दोघांच्या मधे अंतरपाट धरतात व मंत्र म्हणून त्यांच्या मस्तकावर अक्षता टाकतात. हा लग्नातील मुख्य विधी असतो. नंतर वराने स्पर्श केलेले मंगळसूत्र पुरोहित वधूच्या गळ्यात बांधतो. लग्नात ब्राह्मण व लिंगायत असे दोन्ही पुरोहित असतात.

विधवा विवाहाच्या वेळी लिंगायत मठपती पौरोहित्य करतो. नवीन नवऱ्याला वधूच्या आई-बापांना सुमारे शंभर रूपये देज द्यावे लागते. विधवा विवाहाच्या वेळी सुवासिनींना उपस्थित राहता येत नाही. पत्नी व्यभिचारी, आजारी किंवा कुरूप असल्यास पतीला घटस्फोट घेता येतो. क्वचित हे लोक आपल्या मुली यल्लम्माला अर्पण करतात. मग त्या जोगती होतात व वेश्यावृत्तीने राहतात. देवाला अर्पण केलेल्या मुलींना वसवी असे नाव आहे.

### ३.१.४ प्रसूतीप्रथा :

वेरड स्त्रिला तिच्या प्रसूतीच्या वेळी सुईण मदत करते. जननाशौच म्हणून पाच दिवस पाळला जातो. बाराव्या किंवा एकोणिसाव्या दिवशी मुलाचे नाव ठेवण्याचा कार्यक्रम असतो. पाचव्या दिवशी षष्ठीदेवीचे पूजन करतात. मुलगी प्रथम ऋतुमती झाल्यावर तिला मखरात बसवून तिची ओटी भरतात. त्यावेळी वाजंत्र्यांना बोलवले जाते.

### ३.१.५ बेरड जमातीतील देवधर्म :

काही बेरड वैष्णव आहेत तर काही निसर्गपूजक असून थोडे शैव व लिंगायतही आहेत. विजापूरमधील बेरडांच्या दुर्गव्व, मल्लिकार्जून, मारूती, वेंकटेश व यल्लम्मा या कुलदेवता असून त्यांच्या धातूमूर्ती ते घरात ठेवतात. धारवाडच्या बेरडांचा मुख्य देव हनमप्पा हा आहे. सोलापूरमधील बेरड मुख्यत: अंबाबाई, जोतिबा, खंडोबा व पुण्यातील बेरड जनाई,

जोखाई व खंडोबा यांना भजतात. हे लोक दसरा, दिवाळी, नवरात्र इ. सण साजरे करतात. आश्विन व मार्गशीर्ष अमावस्येला ते शेतात डांगोरा नामक एक विधी करतात. दर शनिवारी आणि मंगळवारी ते फक्त संध्याकाळी जेवतात आणि श्रावणातल्या प्रत्येक सोमवारी उपवास करतात. मंत्रतंत्र जादूटोणा यावर त्यांचा विश्वास आहे.

## ३.१.६ बेरड जमातीच्या मर्तिकप्रथा :

"बेरड लोक प्रेते जाळतात किंवा पुरतात. तप्त मुद्रा घेतलेल्या अविवाहितांना आडवे ठेवून व विवाहितांना बसल्या स्थितीत ठेवून पुरतात. प्रेताला स्नान घालून कपडे घालतात. पुरूषाच्या कपाळी भस्म लावतात व स्त्रीच्या डोक्यावर फुलांची जाळी घालतात. तिसऱ्या दिवशी प्रेत पुरलेल्या किंवा जाळलेल्या जागी भात कानोले व पाणी एका मडक्यात घालून ठेवतात व कावळा त्यांना शिवण्याची वाट बघतात. मृताशौच तीन दिवस पाळतात. सातव्या, नवव्या किंवा अकराव्या दिवशी रक्षा व अस्थी गोळा करून नदीत टाकतात आणि आप्तेष्टांना जेवण घालतात. बेळगावच्या बाजूला, बाराव्या दिवशी मृताचा उत्तराधिकारी ब्राह्मणाकडून पाणी आणून ते घरात शिंपडतो, मृत व्यक्ती विवाहित असेल तर चांदीच्या पत्र्यावर तिची प्रतिमा ठोकून आणतो. तेराव्या दिवशी आणि वर्षातून एकदा भाद्रपद, अश्विन किंवा फाल्गुन अमावास्येला पितरांसाठी सानि बांधवांना जेवण घालतात. काही ठिकाणी लिंगायत मठपती त्यांची अंत्यक्रिया करतात.

मुसलमान बेरड सोलापूर, बेळगाव, धारवाड व विजापूर या भागात विखुरलेले आहेत. हैदर अलीने त्यांना बाटवून मुसलमान केले. हैदर आणि टिपू या दोघांच्याही सैन्यात हे लोक होते. सांप्रत ते व्यापार नोकरी इ. व्यवसायात आहेत. हे हनफी पंथाचे सुन्नी असून त्यांच्या चालीरीती इतर मुसलमानांप्रमाणेच आहेत."[११] (ट्रा.का.वॉ.गु.जा.कोल्हापूर गॅझे.)

## ३.२ <u>बेडर</u> :

'बेडर हे वेडर जातीचे दुसरे नाव.'[१२] 'बेडर द.भारतातील एक शिकारी जमात. आंध्रात हिला बोया म्हणतात. हे लोक आपल्याला वाल्मीकीचे वंशज म्हणवतात. हे लोक लढाऊ असून हैदर व टिपू यांच्या सैन्यात खूप भरती होती. कुर्नूल जिल्ह्यात हे चोर घरफोडे

म्हणून ओळखले जातात. यांच्यापैकी काहीजण सुतार, लोहार, पहारेकरी म्हणून काम करतात. पण बहुतेक लोक शेतकरी असून ते स्वत:च्या जमिनी कसतात. त्यांच्या ग्रामप्रमुखाला नायडू, डोरा किंवा सिंहासनबोया असे म्हणतात. जातीतले तंटे व खेडे तो गावातील इतर वृद्ध लोकांच्या सहाय्याने सोडवतो. गुन्हेगाराला तो दंड करतो. त्यातून तो पंचायतीच्या लोकांना जेवण देतो व काही रक्कम स्वत:साठी ठेवतो. ज्यांच्या बाबतीत अन्याय घडला असेल त्यांनाही त्यातली काही रक्कम देतो.'[१३]

'बोया हे तेलूगू बोलतात व बेडर कानडी बोलतात. बोया व बेडर यांचे ऊरू व म्यास असे दोन भेद आहेत. त्यांचे पुन्हा अनेक पोटभेद असून त्यापैकी येम्मलवारू=म्हशी पाळणारे, मंडलवारू= गाई पाळणारे, पुलवारू =फुलमाळी व मीनलवारू =मासे पकडणारे हे जास्त प्रसिद्ध आहेत. ऊरू बोया व ऊरू बेडर यांच्यात परस्पर विवाह होतात; पण ऊरू व म्यास यांच्यात मात्र होत नाहीत. ऊरू कोंबडी खातात व दारू पितात. पण म्यास दारू व मांस यांना स्पर्शही करत नाहीत. इतकेच नव्हे, तर ताडी देणाऱ्या ताडाच्या चटयावरही ते बसत नाहीत.'[१४]

'म्हैसूर भागात बेडरांचे कन्नड व तेलगू असे दोन मुख्य भेद असून, हालू, माची किंवा म्यास, नायक, पेल्लेगार, बारीक कन्नैयनजाती व किरातक अशा त्यांच्या मुख्य पोटजाती आहेत. माची किंवा म्यास हे बहुधा डोंगरपठारावर राहतात. ते कोंबडी किंवा डुक्कर यांचे मांस खात नाहीत पण गोमांस खातात. हे लोक मुलांची सुंता करतात. हैदर अलीच्या सैन्यात असताना या लोकांनी मुसलमानांकडून ही प्रथा उचलली असावी. पंचगव्यप्राशन, निंबाच्या काडीने जिभेला डाग देणे अशासारख्या रूढीही यांच्यात प्रचलित आहेत.'[१५]

रायदुर्ग आणि गुडेकोट या भागात यांच्यामध्ये सुंता करण्याचा विधी पुढीलप्रमाणे आहे. मुलगा सात किंवा आठ वर्षांचा झाला की, त्यावेळी त्याच्या शिश्नावरील थोडीशी चामडी कापून काढतात. मग अकरा दिवस त्याला एका वेगळ्या झोपडीत ठेवतात व कोणीही त्याला शिवत नाहीत. त्या दिवसात त्याला दगडाच्या तुकड्यावर जेवायला वाढतात. बाराव्या दिवशी त्याला स्नान घालतात, नवे कपडे देतात व घरी आणतात. त्यांचे जुने कपडे व दगडाचा तुकडा फेकून देतात. मग त्याचे नातेवाईक त्याला तंगिडू नामक एका झुडपाकडे नेतात व त्याच्यासह ते त्या झुडपाची पूजा करतात. मुलगी प्रथम ऋतुमती झाली म्हणजे तिला

अकरा दिवस एका स्वतंत्र झोपडीत ठेवतात. त्यानंतर ती तंगिडू झुडपाची पूजा करते. बाळंतिणीलाही अशाच स्वतंत्र झोपडीत ठेवतात.

## ३.२.१ बेडर जमातीचा व्यवसाय :

बेल्लारी जिल्ह्यातील बेडर लोक बंदूक, भाला व जाळी घेऊन पूर्वी शिकारीला जात असत. अस्वले, रान डुक्करे, हरणे, ससे इ. प्राण्यांची ते शिकार करीत असत. या लोकांना व्यायामाचीही फार आवड होती. डंबेल्स व करेल घेऊन ते खूप व्यायाम करीत. कुस्त्यांचे फडही ते लावीत असत. तेलगू नववर्षाच्या दिवशी ते डुकरांची शिकार करीत. नववर्षाचा तो शुभ शकून मानला जात असे. हरणांची शिकार करण्यासाठी ते पाळीव काळवीटाचा उपयोग करीत. हरणांच्या कळपाच्या जवळपास शिंगांना जाळे बांधलेला पाळीव काळवीट ते सोडून देत आणि कळपाच्या जवळ हा काळवीट पोचला की कळपाच्या नायक त्याच्याजवळ येत असे मग दोघांची मारामारी होत असे व दोघेही जाळ्यात अडकत असत. मग शिकारी त्या रानवट काळविटाची शिकार करीत.

## ३.२.२ बेडर जमातीतील लोकांची वेशभूषा :

हे लोक कांबळी पांघरतात काही लोक छातीवर एक कपडा बांधतात. शेतात काम करणारे लोक कमरेच्या दोरीला एक लहानसा चिमटा अडकवतात. बोचलेला काटा काढण्यासाठी त्याचा उपयोग होतो. हे दंडावर व गळ्यात ताईत बांधतात आणि हुलिगम्म देवीचा प्रसाद म्हणून पोवळी व हस्तिदंताच्या मण्यांची माळ गळ्यात घालतात. ऊरू आणि म्यास स्त्रिया तोंडावर व हातावर गोंदून घेतात. हनुमान मंदिराचा पुजारी पुरूषांच्या दंडावर शंख व चक्र यांच्या तप्त मुद्रा उठवतो. त्यामुळे त्यांना स्वर्गात प्रवेश मिळणे सोपे जाते अशी त्यांची श्रद्धा आहे. ज्या स्त्रियांच्या दंडावर अशा तप्त मुद्रा उठवतात त्या बसवी बनतात.

## ३.२.३ बेडर जमातीतील देवधर्म :

बेडर जमातीतील लोकांचा तिरूपती वेंकटरमण हा त्यांचा मुख्य देव आहे. त्याशिवाय ते मरिअम्म, हुलिअम्म, कनिंमिरय, कनकरयन, पोलेरम्म इ. देवतांना भजतात व त्यांना फळे, भाज्या, शेळ्या व मेंढ्या अर्पण करतात. ते वर्षातून एकदा कार्तिकात नागाची पूजा करतात

व त्याच्या वारूळावर दूध ओततात. यांच्यापैकी काही वैष्णव तर काही शैव आहेत. वेल्लारी जिल्ह्यातील काही बोयांना जमिनी इनाम मिळाल्या आहेत. भूतबली नामक विधीने जे लोक ग्रामदेवतेला संतुष्ट करतात त्यांनाच अशा जमिनी मिळाल्या आहेत. ग्रामदेवतेच्या जत्रेच्या शेवटच्या दिवशी बोया पुरोहित मध्यरात्री हजामत करतो व मेंढी किंवा रेडा देवीला बळी देतो आणि त्याच्या रक्तात भात कालवून त्याचे पिंड गावच्या सर्व सीमांवर ठेवतो. या वेळी गावातील कोणीही मनुष्य त्याला पाहत नाही. पहाटे तो देवळात परत येतो व स्नान करतो. मग गावकरी त्याला नवी वस्त्रे देतात. या विधीने गावातील अमंगल टळते व गावाला समृद्धी प्राप्त होते अशी समजूत आहे.

'बोया लोकांना पुरोहित म्हणून ब्राह्मणांची गरज लागत नाही. पण ब्राह्मणांना लग्नकार्याच्या प्रारंभी शुभ शकून म्हणून वोटिंगडू नामक विधी करायचा असेल तर त्यांना मात्र बोयांची गरज लागते. या मागची कथा अशी वोटिंगडू नामक एक निराधार बोया होता आणि तो उपासमारीने मेला. तेव्हा त्याच्या जातिबांधवांना भरपूर जेवायला घालून त्याचा आत्मा तरी संतुष्ट करावा असे ब्राह्मणांना वाटले. म्हणून ते सांप्रत पुढील विधी करतात. एका शुभ दिवशी एका बोया पुरूषाला आपल्या घरी बोलवतात व त्याला अंगाला लावायला तिळाचे तेल देतात. तेल लावून झाल्यावर तो टोकाला लिंबू टोचलेला एक सुरा हातात घेऊन येतो. मग त्याला नेतात व जेवायला वाढतात. जेवण झाल्यावर तो किंचाळ्या मारीत व हातातील सुरा नाचवीत घरातून निघून जातो. घरातील लोक थोडा वेळ त्याच्या मागे जातात व त्याच्या मार्गावर पाणी शिंपडतात. या विधीने पुढचे मंगल कार्य निर्विघ्न पार पडेल अशी समजूत आहे.'[१६]

## ३.२.४ बेडर जमातीमधील विवाहप्रथा :

होस्पेटमधील म्यास बेडर लोकांत मुलांचे आई-बाप त्यांची लग्ने ठरवतात. विवाहाच्या दिवशी वधू-वर बोहल्यावर बसतात. मग पाच विवाहित पुरूष वराचे पाय, गुडघे, खांदे आणि मस्तक यांवर हळदीने रंगवलेल्या अक्षता तीन वेळा टाकतात. पाच सुवासिनी वधूच्या बावतीत हाच विधी करतात. मग जमलेल्या सर्व लोकांच्या संमतीने वर वधूच्या गळ्यात ताळी

वांधतो. काही ठिकाणी वर ताळी ब्राह्मणाकडे देतो व ब्राह्मण तिच्या गळ्यात वांधतो.

उरू बेडर लोकांत लग्नाच्या आदल्या दिवशी संध्याकाळी वर पक्षातील मंडळी वधूगृही जातात. तिथे एक जेवणावळ होते. तिच्यासाठी वराचे आई-वाप तांदूळ, नारळ, पान, सुपारी या वस्तू पुरवतात व पाच चोळ्या वधूला भेट म्हणून देतात. जेवण झाल्यावर सर्वजण मांडवात जमतात व देव, गुरू आणि वडिलमाणसे यांना पान सुपारी देतात. दुसऱ्या दिवशी हळद व चुना यांनी रंगवलेले चार माठ चार कोपऱ्यात ठेवतात आणि दोन लहान मुली बसवतात. मग त्यांना तेल लावतात व वधूसह त्या सर्वांना पाच सुवासिनी स्नान घालतात. नवरा-मुलगा व एक मुलगी अशी दोघे मिरवत मारूतीच्या देवळात जातात. मारूतीला नारळ अर्पण केल्यावर वराच्यां कपाळावर विभूती लावतात. परत आल्यावर ब्राह्मण पुरोहित वधू-वरांना जात्याच्या खालच्या तळीवर उभे करतो आणि वराने स्पर्शलेली ताळी तो वधूच्या गळ्यात वांधतो. संध्याकाळी भात, गूळ व दही यांनी भरलेले एक पातेले घरात वधू-वरांजवळ ठेवतात. त्यातला थोडा भात पाच सुवासिनी त्यांना वाढतात व तिथून निघून जातात. मग पाच पुरूष त्या भांड्यातील भात वकावक आपल्या तोडांत भरतात. काही ठिकाणी स्त्रिया व पुरूष दोघेही भात खातात. खाताना जर एखाद्याला ठसका लागला किंवा नंतर काही महिन्यांनी तो आजारी पडला तर वधूची वागणूक ठीक नव्हती, असे समजतात. दुसऱ्या दिवशी वधू-वरांना रस्त्याने मिरवत नेतात आणि त्यावेळी गुलाल उधळतात. लग्नाच्या तिसऱ्या आणि पाचव्या दिवशी सकाळी वधू-वरांना मुसळावर वसवून तेल लावतात. मग वधू पिता जावयाला पागोटे, चांदीची अंगठी व कापड देतो.

बोया लोकांत मुलाचा वाप वधूची निवड करतो. मग वधू पिता त्याला एक दिवस गावच्या वृद्ध मंडळीसह आपल्या घरी वोलावतो. त्या दिवशी वरपिता सोळा शेर तांदूळ, एक शेर डाळ, दोन शेर तुप, एक शेर लाह्या, गुळाच्या दोन ढेपा, पाच हळकुंडे, खारका, लसणीचे कांदे, पान-सुपारी व जाकीट एवढ्या वस्तू आपल्या वरोवर घेऊन वधूगृही जातो. मग विवाहाचा मुहूर्त वगैरे ठरवतात. देज म्हणून २०२ रूपये देण्याची पद्धत आहे. नंतर वराकडील मंडळींनी आणलेल्या सर्व वस्तू वधुपुढे ठेवतात आणि त्यातून तिला तीन मुठी

सुपाऱ्या घ्यायला सांगतात. नंतर त्याच वस्तू आणखी दोन रूपयांसह वधूच्या आई-वडिलांना देतात. साखरपुड्याच्या वेळी जमलेल्या लोकांना जेवण घालण्यासाठी हे जिन्नस दिलेले असतात. साखर पुड्यानंतर पंधरा दिवसांनी किंवा एका महिन्याने मुहूर्त धरतात. लग्न बहूधा वधूच्या घरी होते. वराला मिरवीत मांडवात आणतात. वधू-वरांच्यामध्ये अंतरपाट धरतात. त्यानंतर सोन्याचा मणी असलेला काळा दोरा सर्वांच्या अनुमतीने वर-वधूच्या गळ्यात बांधतो. वधूही वराच्या उजव्या हातात कंकण बांधते. मग वर वधूच्या ओंजळीत काही धान्याचे दाणे घालतो आणि तोही आपल्या ओंजळीत काही धान्य घेऊन वधूच्या ओंजळीवर धरतो. मग वधूपिता त्यांच्या ओंजळीत दूध ओततो. त्यावेळी नवरामुलगा पत्नीशी आमरण एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतो. शपथ घेऊन झाल्यावर तो ओंजळीतील दूध वधूच्या ओंजळीत सोडतो. हा विधी तीन वेळा करतात. मग पत्नीही पतीशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेते. दोघेही जवळच ठेवलेल्या भाताला हात पुसतात. नंतर ती दोघे एकमेकांच्या मस्तकावर भात ओततात. रात्री मोठी मेजवानी होते. दुसऱ्या दिवशी सकाळी वधू-वर वराच्या गावी जातात व तिथे तीन दिवस राहून परत येतात. लग्नाच्या दिवशी संध्याकाळी मंडपात वारूळाच्या मातीवर काही धान्य पेरलेले असते, त्याला तोवर कोंब फुटलेले असतात. नूतन दांपत्य ते अंकूर गोळा करून मिरवीत गावच्या विहिरीत नेऊन टाकते. एवढे झाल्यावर लग्नविधी पुरा होतो. यांच्या लग्नसमारंभात संगीताला बरेच प्राधान्य असते.

व्यभिचार किंवा वाईट वागणूक याबद्दल पंचायतीकडून स्त्रीला घटस्फोट मिळतो. घटस्फोटीत स्त्रीला विधवेप्रमाणे वागवतात. पूर्वी विधवेला पुनर्विवाह करायला बंदी होती. पण तिला एखाद्या पुरूषाबरोबर पत्नीच्या नात्याने राहायला मात्र परवानगी होती. त्यासाठी त्या दोघांनी ज्ञातीला जेवण घालून आपला मनोदय व्यक्त करणे एवढेच आवश्यक होते. तसे न केल्यास त्यांना जातिवहिष्कृत मानीत. अशांची संतती मात्र अवैद्य मानली जाई.

## ३.२.५ बेडर जमातीमधील मर्तिकप्रथा :

'होस्पेटमधील उरू बेडर प्रेते पुरतात. प्रेतांवर नवीन वस्त्र व फुले घालतात आणि प्रेत तिरडीवरून स्मशानात नेतात. मृताचे पुत्र त्यांच्या तोंडात पैसा ठेवतात आणि खड्ड्याजवळ

थोडे पाणी ओततात. मग प्रेत खड्ड्यात ठेवतात व नातेवाईक त्याच्यावर माती लोटतात. मृताचा थोरला मुलगा हातात पाण्याचे सच्छिद्र मडके धरून थडग्याच्या डोक्याशी उभा राहतो. मग थडग्याभोवती तो प्रदिक्षिणा घालतो व मडके फेकून देऊन मागे वळून न बघता घरी जातो. मृताला वारस नसल्यास जो कोणी हा विधी करील, त्याला त्याची संपत्ती मिळते. तिसऱ्या दिवशी मृताचे डोके, पोट व पाय याठिकाणी खड्ड्यावर तीन दगड ठेवतात आणि त्यांना पांढरा रंग देतात. मग एका सुपात कावळ्यांसाठी अन्न ठेवतात. नवव्या दिवशी दिवस-विधी करतात. मनुष्य मृत झालेल्या जागी पाच विड्यांची पाने व भस्माचा एक गोळा यांसह एक पितळेचा तांब्या ठेवतात. हा मृताचा आत्मा असे समजतात. त्याच्याजवळच एक दिवा ठेवतात व मेंढी मारतात. मृताच्या घरातील पुरूषांनी जर मुद्रा घेतलेल्या असतील, तर ते आपले देव नदीवर नेतात धुतात व त्यांची पूजा करतात. घरी आल्यावर देवांना नैवेद्य दाखवितात. मग प्रथम दासरीला जेवायला वाढतात व मग त्याच्या परवानगीने आपण जेवतात. म्हैसूरमधील बेडर मृतांना जाळतात व दुसऱ्या दिवशी त्याची रक्षा पाच तंगिडू झुडपांवर टाकतात.'[१७]

## ३.३ रामोशी :

रामोशी ही एक जात आहे. या लोकांची वस्ती प्राधान्याने महाराष्ट्रात आढळते. ही कानडी बेरडांची एक शाखा असावी असे म्हणतात. हे लोक आपल्याला रामवंशी म्हणवितात. त्यावरून रामोशी हे त्यांचे जातिनाम बनले असावे. रामोशी स्वतःला क्षत्रिय समजतात. यांना रामोशी ही संज्ञा का मिळाली यासंबंधी एक दंतकथा सांगतात ती अशी, "राम वनवासात असताना भरत त्याच्या भेटीसाठी गेला. रामाची व त्याची भेट झाल्यावर भरताने तिथल्या वनवासी लोकांना आपल्याबरोबर अयोध्येत नेले. राम परत आल्यावर त्याने या लोकांची व रामाची भेट घडवली. रामाने त्यांना गावांचे रखवालदार नेमले व रामवंशी म्हणवून घेण्याची परवानगी दिली.'[१८]

'त्यांच्यात 'पुरंदर रामोशी' व 'होळगा रामोशी' असे दोन पोटभेद आहेत. या दोन्ही गटात रोटी बेटी व्यवहार होत नाहीत. त्याचप्रमाणे एकाच आडनावांच्या कुळांत व समान

कुलदैवत असणाया कुळांतही विवाह होत नाहीत. रामोशी पुरूष उंचेपुरे, बळकट, बांधेसुद, व राकट असतात. त्यांचा वर्ण काळा असतो. ते कानात कर्णफुले घालतात. त्यांच्या गळयात कंठी व सुलेमानी गंडा असतो. त्यामुळे भूतपिशाच्यांपासून आपले संरक्षण होते असे ते समजतात. त्यांच्या स्त्रिया दिसायला सुंदर असतात. गोमांस सोडून इतर सर्व प्रकारचे मांस ते खातात.'[१९]

'पूर्वी हे लोक तेलगू भाषा बोलत असत. पण सध्या ते मराठी बोलतात. काही लोकांच्या बोलण्यात कानडी शब्द येतात. त्यांची एक सांकेतिक भाषा आहे. पूर्वी लुटमारी करीत असताना किंवा गुप्त व्यवहार करताना ते ही भाषा बोलत असत. त्या भाषेतील काही शब्द व काही वाक्ये अशी, अकुल–विडयाचे पान, अदत–स्त्री अथवा पत्नी, अरिल–सोनार, कडमल–भाकरी, यडूल–बैल, पटण–पकडणे, नोलग्या–फौजदार. कुडमल इडमल अन ओकना –त्याला भाकरी दया आणि जाऊ द्या. गोंन्ये तरी यरवाड मात इसमाडू नको – ठार मारले तरी सांगू नको.'[२०]

'रामोशांचा व्यवसाय दरोडे घालणे, चोऱ्या करणे, हे एकेकाळी प्रमुख व्यवसाय होते. त्यासाठी ते तोडीच्या बंदुका, गोफणी, कुऱ्हाडी, काठया, इ.हत्यारे वापरीत असत. मराठेशाहीत यांच्याकडे पालेगारीचे काम असे. पण इंग्रजी राजवटीत त्यांना कामावरून कमी करण्यात आले व त्यांची इनामी ही जप्त करण्यात आली. त्यामुळे दरोडे घालू लागले. उमाजी नाईक हा रामोशी दरोडेखोर असूनही सचोटी व गरिबांचा कळवळा या त्याच्या गुणांमुळे प्रसिद्ध होता. वासुदेव बळवंतांना या लोकांत शौर्य, निष्ठा व इमान हे गुण आढळले म्हणून त्याने रामोशांची एक संघटना उभारली होती. ज्याचे घरचे मीठ हे खात त्याच्याशी नमकहरामी करत नसत. १२ बलुत्यांमध्येही रामोश्यांची गणना होते. काही रामोशी जागल्याचे ही काम करतात. अलीकडे हे शेती, नोकरी इत्यादी व्यवसाय करू लागले आहेत. रामोश्यांचा सामाजिक दर्जा कुणब्यांहून खाली पण महार, मांगांहून वरचा मानतात. बुरूड, घडशी, परीट, मुसलमान, सोनार, सुतार व तेली यांना रामोश्यांच्या हातचे अन्न चालत नाही.'[२१]

## बेरड, बेडर व रामोशी यांच्यातील काही महत्वाच्या बाबी :

बेडर किंवा वेड मुख्यत्वेकरून कर्नाटकांत आढळतात. ते आपणास 'नाईक मक्कलू म्हणजे नाईकांची मुले असे म्हणतात. त्यांना नाईकवाडी, तलवार आणि वाल्मिक अशींही नावे आहेत. ह्यापैकी पहिले व तिसरे नाव रामोशांसही आहे. बेरड आणि रामोशी ह्यांचा धंदाही एकच आहे. शिवाय दोघांतही हळगे नावांचा एक पोटभेद आहे. या सर्व गोष्टीवरून बेरड आणि रामोशी मूळ एक असून पुढे भाषा व वास्तव्य यामुळे त्यांच्या दोन जाती झाल्या असे दिसते. तेलगू बोया आणि तामिल वेडन ह्यांच्याशीही बेरडांचा अगदी निकट संबंध आहे असे वाटते. रामोशी शिवाय इतर सर्वही जाती आपली उत्पत्ती कनय्या नावाच्या पुरूषापासून झाली आहे असे सांगतात.[३८] विजयनगरचा नाश झाल्यानंतर बरेच दिवस बेरड ते शहर लुटीत होते असे इतिहासात वर्णन आहे. त्यांची स्वामीनिष्ठा अद्वितीय असल्यामुळे हैदर अलीने त्यांस मुसलमानी धर्माची दिक्षा देऊन आपल्या सैन्यात त्यांची स्वतंत्र पथके बनविली होती. निजामच्या राज्यातील शोरापूर संस्थानात बेरडांचे राज्य होते असे मेडोज टेलरचे म्हणणे आहे. इंग्रजी अमलाच्या सुरूवातीच्या काळी बेरडापासून लोकांस बराच उपद्रव होत असे. त्याचा बंदोबस्त सन १८२० साली करण्यात आला. तथापि अजूनही ते मधून-मधून चोऱ्यामाऱ्या करतात व दरोडेही घालतात. काही बेरड शेती करतात. काही तलवारू (गावचे रखवालदार) असून त्याबद्दल त्यांस इनाम जमिनी आहेत काही पाटील आहेत, काही मजूरी करतात व काही पारध करतात व जाळी लावून पक्षी धरतात.

'बेरडांत दुर्गामुर्गी हळगे, जस किंवा म्यास, नाईकमक्कलू आणि रामोशी असे पोटभेद आहेत. त्यांचा परस्पर रोटीबेटीव्यवहार होत नाही. त्यांच्यात पुष्कळ वेडगू (कुळे) आहेत. त्यात म्हैसूर संस्थानातील बेरडांच्या बेडगूपैकी बरेच आढळतात. त्यावरून ह्या दोन्ही बेरडांचे मूळचे ऐक्य निदर्शनास येते. वेडगू एकच असेल तर शरीरसंबंध करता येत नाही. भाचीशी व मामे बहिणीशी लग्न करता येते. लग्न बहूधा अगदी लहानपणीच करतात. कधी-कधी मुलींची लग्ने न करता त्यास मारूतीस किंवा यल्लम्मा देवीस अर्पण करतात. त्यांना 'बसवी' किंवा 'जोगती' म्हणतात. अशा मुली बहुधा वेश्यावृत्तीने राहतात. विधवा विवाहास

मोकळीक आहे. सोडचिठ्ठी देता येते.'[२२]

'बेरड मुख्यत्वेकरून दुर्गव्वा, मल्लिकार्जून, मारूती, यल्लम्मा आणि खंडोबा यांस भजतात. त्यांचे उपाध्ये ब्राम्हण असतात. काही अंत्यविधी चालविण्याच्या कामी लिंगायत मठपतींची योजना करतात. मृतास जाळण्यात अगर पुरण्यात येते. मृताच्या शांत्यर्थ भाद्रपद अश्विन अथवा फाल्गुन महिन्याच्या अमावास्येला जातीच्या लोकांना जेवण देतात. विजापूर जिल्ह्याशिवाय इतर ठिकाणी राहणारे बेरड डुकरांचे व गाईचेही मास खातात. ते दारू पितात ते मुसलमानांच्या हातचे अन्न खातात. पण मुसलमान त्यांच्या हातचे अन्न खात नाहीत.'[२३]

## ३.४ माणगांव खेड्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

महाराष्ट्र राज्याच्या दक्षिणेचा शेवटचा भाग म्हणजे कोल्हापूर जिल्हा आणि कोल्हापूर जिल्ह्याचे दक्षिणेकडील शेवटचे टोक म्हणजे चंदगड तालूका. या चंदगड तालूक्याला कर्नाटक व गोवा या दोन राज्यांच्या सीमा लागून आहेत. पाटणे फाटा ते कोवाड या रस्त्यावर हुलकाई देवी टेकडीच्या पायथ्याशी वसलेले माणगाव हे गाव आहे. गावच्या दक्षिणेस पश्चिमेकडून पूर्वेस संथ वाहत साद घालणारी ताम्रपर्णी नदी. ताम्रपर्णी नदीच्या तीरावर वसलेला हिरवागार शिवार, पश्चिमेला ऐतिहासिक अशी भीमचूल आणि आजू-बाजूला असलेली लहान-लहान खेडी यांच्या मध्यवर्ती असलेले माणगाव हे गाव. ग्रामदैवत माणकेश्वराच्या वास्तव्याने पावन झालेले हे गाव माणकेश्वर या ग्रामदैवतावरून माणगाव हे नाव पडलेले आहे. या गावाला निसर्गाची जणू देणगीच लाभलेली आहे. शिक्षण, राजकरण, कला, क्रिडा, व्यापार, उद्योग इत्यादींचा वारसा जोपासलेले अनेक क्षेत्रात आघाडीवर असलेले माणगाव.

गावामध्ये हिंदू, मुसलमान, लिंगायत, ख्रिश्चन असे विविध जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहत आहेत. एकमेकात मिळून मिसळून सण उत्सव साजरे करतात. माणगांव हे तालूक्यातील मध्यवर्ती केंद्र असून गावात ग्रुप ग्रामपंचायत आहे. दर मंगळवारी गावचा आठवडा बाजार भरतो. पूर्वी माणगाव हे गाव तांदळाची बाजारपेठ, लोण्याची बाजारपेठ होती. पश्चिमेला ऐतिहासिक अशी भीमचूल आहे. या भीमचूलीवर भीमाच्या रथाची चाके, घोड्यांचे पाय, दगडामध्ये उमटलेली माणसाची पाऊले पाहायला मिळतात. ती मोठी

असल्यामुळे भीमाची पाऊले या नावाने ओळखली जातात. अजूनसुद्धा पावसाने ओढ धरली आणि नुकसान होणार असे वाटल्यास पावसासाठी भीमाकडे साकडे घातले जाते.

गावच्या मध्यवर्ती ठिकाणी गावचे ग्रामदैवत माणकेश्वर मंदीर असून ग्रामदैवत माणकेश्वराच्या वास्तव्याने गाव पावन झाले आहे. माणकेश्वर देवालयाची वास्तू ही लोक सहभागातून व लोकवर्गणीतून भव्य, दिव्य व देखणी अशी वास्तू उभी केलेली आहे. दर महाशिवरात्रीला माणकेश्वराची पूजा-अर्चा लोक मोठ्या भक्तीभावाने करतात.

गावच्या सीमेवर सिमदेव मंदीर असून गावालगतच्या टेकडीवर हुलकाई देवीचे मंदीर आहे. माणगावच्या पंचक्रोशीतील लोक एकत्र येऊन दरवर्षी मोठ्या भक्तीभावाने या देवीची दरवर्षी यात्रा करतात. गावात मध्यभागी लक्ष्मी देवालय असून हे ही गावातील लोकांचे श्रद्धास्थान आहे. लक्ष्मी देवीची यात्रा पूर्वी २२ वर्षांनी भरत होती मात्र आता ठराविक अशी कालमर्यादा नाही. ही यात्रा गावातील आणि पंचक्रोशीतील सर्व लोक मोठ्या पारंपरिक रितीरिवाजाप्रमाणे साजरी करतात. लक्ष्मी मंदीराजवळच हनुमानाचे (मारूतीचे) मंदीर आहे. हनुमान जयंतीला हनुमान उत्सव साजरा केला जातो. गावात मरगाई देवी, थळोवा यांचीही मंदिरे आहेत. एकूण १२ अदृश्य लिंगापैकी ५ लिंगे केवळ या गावात दृश्य स्वरूपात पहावयास मिळतात. हा केवळ दुर्मिळ योगायोग आहे.

माणगाव गावातील गणेशोत्सव म्हणजे अकरा दिवस लोकांसाठी पर्वणीच असते. गावात दोन गणेशोत्सव मंडळ असून खाजगी स्वरूपात सुद्धा गणपतीचे देखावे उभारले जातात. गणेशोत्सव मंडळ म्हणजे केवळ देखावेच नसून त्यातून दारूबंदी, हुंडाबंदी, पर्यावरणाचे रक्षण अशा अनेक प्रश्नांवर समाज प्रबोधन करून जनजागृती केली जाते. या मंडळाच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक वर्षी तालूका स्तरावरील गणराया अवार्ड मिळाले आहेत. केवळ पंचक्रोशीतीलच नव्हे तर तालूक्यांतून व कर्नाटकातून सुद्धा लोक येथील देखावे पाहण्यास येतात. गावामध्ये दसरा हा सण मोठ्या उत्साहाने साजरा होत असून ग्रामदैवत माणकेश्वराची पालखीतून भव्य मिरवणूक काढली जाते. या उत्सवात मलगड, हुंबरवाडी, माणगाववाडी, लाकूरवाडी या गावातील लोक मोठ्या भक्तिभावाने सहभागी होतात.

माणगाव गावात मुस्लिम समाजाचे मस्जिद असून मस्जिदाच्या व्यवस्थापनाचे काम मुस्लिम समाजातील लोक करीत असतात. मस्जिदमध्ये दररोज नमाजपठण केले जाते. त्यांचे रमजान, मोहोरम, बकरी ईद यासारख्या सणांमध्ये हिंदू लोकही मनापासून सहभागी होतात. गावच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली बाग-बगीच्याने नटलेली टुमदार शाळा उंच भागावर आसनस्थ झालेली आहे. ह्या दिमाखदार शाळेची स्थापना १ जानेवारी १९११ रोजी ब्रिटिशांच्या राजवटीत झाली. पूर्वी म्हणजे १९५० पर्यंत या गावात ५ वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय होती ती १९५० नंतर ७ वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय करण्यात आली होती. जवळपास गावामध्ये ७ वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय नसल्याने व या ज्ञानमंदीरात दर्जेदार शिक्षण मिळत असल्याने विद्यार्थ्यांचा ओढा या माणगाव गावाकडे असायचा. आजच्या स्थितीत या गावामध्ये १२ वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

गावात प्राथमिक आरोग्य केंद्र असून खाजगी स्वरूपातील दवाखाने सुद्धा आहेत. वैद्यकीय सेवेसाठी माणगाव हे गाव नावाजलेले आहे. या दवाखान्यामध्ये उत्कृष्ट अशी वैद्यकीय सेवा रूग्णांना दिली जाते. गावामध्ये अनेक तरूण मंडळे असून चांगल्या कार्यासाठी नेहमीच अग्रेसर आहेत. मोफत वैद्यकीय शिबीरे, पथनाट्ये, क्रिडास्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा, बौद्धिक स्पर्धा यासारख्या स्पर्धांचे आयोजन वर्षभर केले जाते.

गावच्या मध्यवर्ती ठिकाणी वाचनालय असून वाचनालयासाठी स्वतंत्र इमारत आहे. तेथे विविध प्रकारची दैनिके, मासिके, अनेक ग्रंथ, गोष्टींची पुस्तके इत्यादी संग्रह असून लहानपणापासून थोरांपर्यंत त्याचा आस्वाद घेतात व आपल्या ज्ञानात भर घालतात.

'Sound Mind in a sound body' (निरोगी शरीरात निरोगी मन वास्तव्य करते.) या उक्तीप्रमाणे शरीर निरोगी करण्यासाठी गावात व्यायाम शाळा आहे. व्यायामशाळेमध्ये व्यायामाचे अत्याधुनिक साधने आहेत त्याचा उपयोग अनेक लहान थोर मंडळी करतात. या व्यायामशाळेतील बरेचशे तरूण सैनिक म्हणून लष्करामध्ये दाखल होऊन भारत भूमीचे रक्षण केले आहे व करीतही आहेत.

भक्तिरसात न्हाऊन पारायण, वारकरी यात्रा, रेणूका देवी यात्रा अशासारख्या यात्रांमध्ये मोठ्या भक्तीभावाने पंचक्रोशीतील सर्व लोक सहभागी होतात. गावामध्ये पूर्वापार चालत आलेले व्यावसायिक, बारा बलुतेदार तसेच इतरही अनेक व्यवसाय करणारे ही लोक वास्तव्य करीत आहेत. यामध्ये बेरड समुदायातील लोकसंख्या बहुसंख्य आहे. गावामध्ये काही मूर्तिकार कलावंत आहेत. की जणेकरून गावाची प्रतिष्ठा वाढवतात. कोल्हापूरी चपलांचा लौकीक असणारे माणगाव येथून अनेक नागरिक कोल्हापूरी चपला खरेदी करतात व माणगावची प्रसिद्धी वाढवितात.

गावामध्ये आर्थिक उलाढाल करणाऱ्या सेवाभावी संस्था, पतसंस्था सर्वांच्या जिव्हाळ्याची असणारी के.डी.सी.सी.बँक, देना बँक, सेवा सोसायटीज्, दूध डेअऱ्या कार्यरत आहेत. गावात औषधोपचाराच्या सोईसाठी मेडीकल दुकाने, लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्टेशनरी दुकाने, अल्पोपहारासाठी उपहारगृहे तसेच लोकांच्या प्रवासाची गरज लक्षात घेऊन वाहतुकीची सोय गावामध्ये आहे.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ देखणा पुतळा चौकात उभा केलेला आहे. तर घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा गावच्या वेशीत आहे. शिवाजी महाराज व बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा गावाने जपला आहे. जयंती, पुण्यतिथी, अनेक महिला मेळावे, रक्तदान शिबिरे असे नाविन्यपूर्ण उपक्रम गावात आयोजित केले जातात. गावच्या पूर्वेला संथ वाहणारी ताम्रपर्णी नदी आणि तिच्या दोन्ही काठावर पसरलेला हिरवागार शिवार या शिवारामध्ये अहोरात्र आपली काया झिजवणारा शेतकरीवर्ग आपल्या शेतात राबून नवीन-नवीन प्रयोग करणारा प्रगतशील शेतकरी आज ग्रामीण विकासाला हातभार लावून माणगाव गावचे नाव उज्वल करीत आहेत. असा हा माणगाव गाव चंदगड तालूक्यातील एक आदर्श गाव आहे.

## ३.४.१ लोकसंख्या :

२००१ च्या जनगणनेनुसार कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालूक्याची एकूण लोकसंख्या १,८०,७८१ इतकी आहे. त्यापैकी पुरूषांची संख्या ८८,९२४ इतरकी तर स्त्रियांची संख्या

९१,८५७ इतकी आहे. या आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की चंदगड तालूक्यामध्ये पुरूषांच्यापेक्षा स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. माणगाव गावच्या लोकसंख्येचा विचार केल्यास असे आढळते की माणगाव गावाची एकूण लोकसंख्या ३,६२१ इतकी आहे. त्यापैकी पुरूषांची संख्या १८०६ इतकी तर स्त्रियांची संख्या १८१५ इतकी आहे. या आकडेवारीवरून असे दिसून येते की माणगाव गावातील पुरूष व स्त्रियांची संख्या जवळपास सारखीच आहे. माणगाव गावात गुप ग्रामपंचायत आहे. त्यामध्ये माणगाव, माणगाववाडी, हुंबरवाडी व मलगड अशा एकूण चार गावची मिळून एक ग्रामपंचायत आहे. या गुपपंचायतीची एकूण लोकसंख्या ४५६७ इतकी असून ती अनुक्रमे माणगाव ३६२१ (पुरूष १८०६, स्त्रिया १८१५), माणगाववाडी ३८७ (पुरूष १९२, स्त्रिया १९५), हुंबरवाडी ३८३ (पुरूष १६५, स्त्रिया २१८), मलगड २३६ (पुरूष ११४, स्त्रिया १२२) अशी आहे. चंदगड तालूक्यातील जास्त लोकसंख्या असलेल्या खेड्यापैकी माणगांव हे एक खेडे आहे.

## ३.४.२ साक्षरता :

२००१ च्या जनगणनेनुसार माणगाव खेड्यातील एकूण लोकसंख्येपैकी २०२७ इतके लोक साक्षर आहेत. उर्वरीत १५९४ लोक निरक्षर आहेत. साक्षर लोकांपैकी १२३१ इतके पुरूष तर ७९६ इतक्या स्त्रिया ह्या साक्षर आहेत. तसेच निरक्षर लोकांपैकी ५९५ इतके पुरूष तर १०१९ इतक्या स्त्रिया निरक्षर आहेत. या आकडेवारीवरून असे दिसून येते की माणगाव खेड्यामध्ये पुरूषांपेक्षा स्त्रियांचे निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. चंदगड तालूक्याच्या बाबतीत विचार केल्यास २००१ च्या जनगणनेनुसार असे दिसून येते की चंदगड तालूक्यामध्ये एकूण साक्षर लोक १,०३,८७१ इतके असून निरक्षर लोक ७६,९१० इतके आहेत. साक्षर लोकांपैकी ६१,३०० इतके पुरूष तर उर्वरीत ४२,५७१ इतक्या स्त्रिया आहेत. तसेच निरक्षर लोकांपैकी २७,६२४ इतके पुरूष तर ४९,२८६ इतक्या स्त्रिया आहेत.

## ३.४.३ स्थान व भौगोलिक परिस्थिती :

कोल्हापूर जिल्ह्याच्या दक्षिणेकडील चंदगड तालूक्यातील निसर्गरम्य अशा तालूक्यात कर्नाटक, महाराष्ट्र, गोवा या राज्यांच्या सीमेवर आजरा, सिंधुदूर्ग, दोडामार्ग, बेळगाव या

तालूक्यांच्या मध्यवर्ती ठिकाणी चंदगड तालूक्यातून जाणारा बेळगाव-वेंगुर्ला या महामार्गावर पाटणे फाटा ते कोवाड या रस्त्याच्या मध्यवर्ती आणि ताम्रपर्णी नदीच्या तीरावर माणगाव हे गाव वसले आहे. या गावाचा पौराणिक, राजकीय, भौगोलिक, ऐतिहासिक इतिहास फार पूर्वी पासूनचा आहे. भीमचूलीच्या जवळ व हुलकाईदेवीच्या पायथ्याशी या गावाची वस्ती आहे. हे गाव चोहोबाजूंनी दळण-वळणाच्या दृष्टीने जोडलेले आहे. कोवाड-माणगाव, आमरोळी-माणगाव, पाटणेफाटा-माणगाव, तांदूळवाडी फाटा-माणगाव अशा चौरंगी रस्त्यानी जोडले आहे. या गावच्या दक्षिणेकडे ताम्रपर्णी नदी संथ वाहत जाते. उत्तरेकडच्या बाजूला लकीकट्टे धरण आहे. अशा या निसर्गरम्य वातावरणात पाण्याची कोणत्याही ऋतूत टंचाई भासत नाही असे हे गाव झाडे-झुडपे, फळे-फुलांनी भरलेल्या ठिकाणी वसलेले आहे.

माणगाव खेड्याचे हवामान पाहिल्यास तेथील हवामानामध्ये समतोलपणा असलेला दिसून येतो. माणगाव खेड्याचे हवामान मान्सून स्वरूपाचे आढळते. तिनीहीऋतूंचा समतोलपणा आढळतो. उन्हाळ्यामध्ये माणगाव खेड्याचे तापमान कामल ३३$^{\circ}$ C व किमान ३0$^{0}$C असते. माणगाव खेड्यामध्ये पर्जन्यवृष्टी वार्षिक सरासरी २५0 ते ३00 से. मी. इतका पाऊस पडतो. येथील शेतकरी हा कष्टाळू असून वर्षभर हिरवीगार शेती करत असतो. येथील शेतकरी खरीप व रब्बी अशा दोन प्रकारची पिके वर्षभर घेतो. खरीप पिकामध्ये नाचणी, भात, भूईमूग, ऊस, बटाटा, रताळी इत्यादी पिके तर रब्बी पिकामध्ये ज्वारी, मसूर, वाटाणा, हरभरा व मका इत्यादी पिकांचा समावेश होतो.

बेरड ही विमुक्त जमातीमधील एक जमात आहे. प्रदेशपरत्वे या लोकांना बेरड, नाईकवाडी, ब्याडेरू, तलवारू, नाइकमक्कलू, काटक ही नावे आहेत. यांची मूख्य वस्ती बेळगाव, धारवाड, विजापूर व कोकण येथे आहे. बेरड लोकांत नाइकमक्कलू, वाल्मीक किंवा खुद्द बेरड, भिल्ल किंवा किरात, बिले किंवा हलगे, जस, नस, म्यास किंवा कवलेटट्टू कक्करमुंडी किंवा हेसी आणि केरी किंवा दुर्गामुर्गी असे पोटभेद असुन त्यांच्यात परस्पर लग्नसंबंध होतात.

बेरड समुदाय सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत मागास राहिलेला आहे. त्यांच्यामध्ये अज्ञान, अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात होत्या. पूर्वजापासून चालत आलेल्या प्रथा, परंपरा, चालीरीती ह्या आदर्श मानून त्याचा वारसा पुढे चालवणे त्यांना योग्य वाटत असे किंवा त्यातच त्यांना सुख-समाधान वाटत होते. त्यांच्यापाठी मागे त्यांच्या मध्ये रूजलेली पाप-पुण्याची कल्पना होती.

बेरड या जातीच्या विकासाकडे शासनाने दुर्लक्ष केले असल्यामुळे या जमातीचा विकास झालेला नव्हता. तसेच जातीबद्दल पूर्वीपासून 'गुन्हेगारी' जमात म्हणून एक विशिष्ट प्रकारचा दाग लावलेला असल्यामुळे या जमातीपासून समाजातील इतर लोक या जमातीशी कोणत्याही प्रकारचे संबंध ठेवत नसत. परिणामी ही जात सर्वच क्षेत्रामध्ये मागासलेली होती. पण बदल हा निसर्गाचा नियम आहे या उक्तीप्रमाणे प्रत्येक समाज वेगाने बदलत जातो तर काही समाज मंदगतीने बदलत जातो परंतु तो बदलतोच, तेव्हा याला बेरड समाज सुद्धा कसा अपवाद राहिल? बदलत्या परिस्थितीनुसार, काळानुसार बेरड समाज सुद्धा बदलत चाललेला आहे. इतर सवर्ण समाजाचे तो अनुकरण करत आहे. आधुनिकीकरण, पाश्चिमात्यीकरण तसेच नागरीकीकरणाच्या प्रक्रियांचा तो अनुभव घेत आहे. त्यामध्ये तो समायोजन साधण्याचा प्रयत्न करत आहे.

चंदगड तालूक्यातील माणगांव खेड्यातील बेरड समाज आपले सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक स्थान उंचावण्याचा प्रयत्न करत आहे. हा समाज आपल्या पूर्वीच्या जीवनपद्धतीमध्ये बदल करून नवनवीन जीवन पद्धतीचे अनुकरण करत आहे. आजच्या स्पर्धेच्या या युगामध्ये आपले अस्तित्व टिकवून आपल्या गुण वैशिष्ट्यांची जपणूक करताना दिसतो आहे. परंतु ही आपली गुणवैशिष्ट्ये टिकविण्यासाठी, आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी तसेच आपण ही कुठे कमी नाही हे दाखविण्यासाठी आपल्या जीवनपद्धतीमध्ये एकंदरीत संस्कृतीमध्ये बदल करून घेतलेला आहे. हा नेमका बदल कोणता? त्याची गुणवैशिष्ट्ये कोणती? बेरड समुदायाची पूर्वीची म्हणजेच त्यांना विमुक्त जमात म्हणून घोषित करण्याच्या अगोदरची त्यांची परिस्थिती कोणती व कशी होती? आणि सद्यपरिस्थितीत त्यांची परिस्थिती कोणती व कशी आहे? याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या लघुशोध निबंधामध्ये केलेला आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

या लघुशोध निबंधामध्ये बेरड समुदायाची पूर्वीची परिस्थिती (स्वातंत्र्यपूर्वी) आणि सद्यपरिस्थिती (स्वातंत्र्योत्तर) अशा दोन्ही परिस्थितींचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे.

### ३.४.५ माणगाव खेड्यातील बेरड समुदायाचे स्थान :

माणगाव खेड्यामध्ये बेरड समुदायाला मानाचे स्थान असलेले दिसून येते. बेरड समुदाय हा माणगाव खेड्याच्या उत्तर दिशेला वसलेला आहे. माणगाव खेड्यामध्ये अनुसूचित जाती-जमाती आहेत. यां सर्व जमातीमध्ये बेरड जमातींच्या लोकांची संख्या जास्त असलेली दिसून येते. हा समुदाय पूर्वीपासूनच माणगाव खेड्यामध्ये स्थायी असलेला दिसून येतो. बेरड समुदायाला माणगाव ग्रामपंचायतीतून व शासनाकडून अनेक योजना राबविल्या गेलेल्या आहेत. पूर्वीच्या बेरड समुदायाची स्थिती पाहिल्यास अत्यंत मागासलेली, विकट असलेली दिसून येते. परंतु सद्यपरिस्थितीचा विचार केल्यास त्यामध्ये खूपच फरक जाणवतो. आजच्या स्थितीत बेरड समुदायाला माणगाव गावामध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसून येते. बेरड समुदायातील लोकांचा प्रवेश आता ग्रामपंचायतीमध्ये, राजकारणामध्ये, सत्तेमध्ये असलेला दिसून येतो. बेरड समुदायातील शिक्षणाबाबतचा विचार केल्यास समाधानकारक स्थिती जाणवते. माणगावातील सवर्ण लोक व इतर लोक बेरड समुदायातील लोकांना सन्मानपूर्वक,वआदराची वागणूक देताना दिसतात. गावातील महत्त्वपूर्ण निर्णयामध्ये त्यांच्या मतांचा, अभिप्रायांचा विचार केला जातो. एकंदरीत माणगाव गावातील बेरड समुदायाचे स्थान लोकसंख्येप्रमाणे भक्कम असलेले दिसून येते.

## ३.५ बेरड समुदायातील काही क्रांतीकारक / समाजसुधारकांविषयीची माहिती :

### १. उमाजी नाईक :

'भारताच्या इतिहासात अनेक ऐतिहासिक घटना घडल्या गेल्या. काही घटनांची नोंद झाली, तर काही राहूनही गेल्या. इतिहासकारांनी सन १८५७ च्या उठावाला अधिक महत्त्व दिले. परंतु त्याअगोदरही अनेक उठाव, बंड झाले होते अशा या पहिल्या बंडाद्वारे सलग १४ वर्षे इंग्रजांना सळो की पळो करून सोडणारा व सर्व प्रथम क्रांतीचे स्वप्न पाहणारा महाराष्ट्रातील निधड्या छातीचा एक वीर हा आद्यक्रांतीकारक नरवीर ठरला गेला, तो

म्हणजे उमाजी नाईक.'[२४] 'महाराष्ट्रातील एकोणिसाव्या शतकातील कंपनी सरकारविरूद्ध प्रतिसरकाचा प्रयोग करणारे आणि उमाजी नाईक एक अस्सल दरोडेखोर होते.'[२५]

'नरवीर उमाजी नाईकांचा जन्म रामोशी-बेरड या समाजात पिता-दादोजी खोमणे (नाईक) व माता लक्ष्मीबाई यांच्या उदरी ७ सप्टेंबर १९७१ रोजी पुणे जिल्ह्यातील भिंवडी येथे झाला. उमाजीचे सर्व कुटुंब पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी इमानेइतबारे पूर्वापार सांभाळत होता. त्यामुळे त्यांना गडनायक (नाईक) ही पदवी बहाल होऊन खोमणेऐवजी नाईकच सर्वजण म्हणत असत. उमाजी जन्मापासूनच हुशार, चंचल तसेच शरीराने धडधाकट, रागट, उंच बांध्याचा करारी असल्याने त्याने ल्वकरच रामोशांची पारंपरिक हेरकला आत्मसात केली.'[२६]

'दरम्यानच्या काळात इंग्रजांनी हिंदूस्तानात सत्ता स्थापन करण्यास सुरूवात केली होती. हळूहळू काही मराठी भाग ताब्यात घेतला. पुण्याचा मुलूखही जिंकला इंग्रजी सेनापती वेलस्लीने ते १८०३ मध्ये तेथे दुसऱ्या बाजीराव पेशव्यास स्थानापन्न केले.'[२७] त्याने इंग्रजांचे पाल्य म्हणून काम सुरू केले. सर्वप्रथम त्याने इतर किल्ल्याप्रमाणे पुरंदर किल्ल्यावरील संरक्षणाचे काम रामोशांकडून काढले. छत्रपतींनी दिलेली वतने नष्ट केली व आपल्या मर्जीतील माणसे तेथे बसविली. त्यामुळे रामोशी समाजावर उपासमारीची वेळ आली. इंग्रजी सत्तेचा पाया भक्कम होत गेला. भयंकर दुष्काळही पडला. इंग्रजांचा देशावर अमंल सुरू झाला. जुलमी कायद्यापुढे मराठी जनता तग धरीत नव्हती. आया-वहिणींची अब्रू उघड्यावर लूटू लागली. अशा परिस्थितीत करारी उमाजी बेभान झाला. छत्रपती शिवरायांना श्रद्धा-स्फूर्तीचे स्थान देत त्यांचा आदर्श घेऊन स्वत:च्या अधिपत्याखाली स्वराज्याचा पुकार करत माझ्या देशावर परकियांना राज्य करू देणार नाही व माझ्या जनतेला उपाशी मरू देणार नाही असा पण करत विठूजी नाईक, कृष्णा नाईक, खुशाबा रामोशी, बाबू सोळकर यांना बरोबर घेऊन कुलदैवत जेजुरीच्या श्री.खंडेरायाला भंडारा उधळत शपथ घेतली व इंग्रजाविरोधात पहिल्या बंडांची गर्जना केली. इंग्रज, सावकार, मोठे वतनदार अशांना लूटून गोरगरिबांना आर्थिक मदत करण्यास सुरूवात केली. कोणत्याही स्त्रीवर अन्याय झाला, तर तो भावासारखा धावून

जाई. इंग्रजांना त्रास देण्यामुळे उमाजीला सन १८१८ ला इंग्रजांनी पकडून वर्षभर तुरूंगातही डांवले होते. पण तुरूंगातही उमाजीने लिहिणे-वाचणे शिकले व हा वेळ सत्करणी लावला होता. उमाजी सुटल्यानंतर त्यांने इंग्रजाविरोधात कारवाया आणखी वाढवल्या.

उमाजी हा देशासाठी लढत असल्याने देशवासी उमाजीला सहकार्य करू लागले. इंग्रज त्यामुळे मेटाकुटीला आले. उमाजीला परत पकडण्यासाठी कॅप्टन मोकीन टॉस या इंग्रज अधिकाऱ्याची नेमणूक केली. त्याने सासवड-पुरंदरच्या मामलेदारास फर्मान सोडले. मामलेदार इंग्रज सैन्य घेऊन पुरंदरच्या पश्चिमेकडील एका खेड्यात गेला असता तेथे उमाजीचे मावळे व इंग्रज सैन्यात गनिमी लढाई झाली. त्यात उमाजीचा जय होऊन उमाजीने पाच इंग्रज सैन्यांची मुंडकी कापून सासवडला मामलेदाराकडे पाठविली होती. त्यामुळे इंग्रजांनी मोठी धास्ती घेतली. उमाजीचे सैन्य डोंगरदऱ्यात टोळ्या करून राहत असे. एका टोळीत पाच हजार सैन्य होते. "फेब्रुवारी १८२४ ला उमाजीने 'भावुर्डी' येथील इंग्रजांचा खजिना लूटून देवळाच्या देखभालीसाठी जनतेला वाटला होता तर ३0 नोव्हेंबर १८२७ ला उमाजीने इंग्रजांना ठणकावून सांगितले होते की, आज हे एक वंड असले तरी असे हजारो वंड सातपुड्यापासून सह्याद्रीपर्यंत उठतील व तुम्हाला जेरीस आणतील, असा इशारा देऊन ते थांवले नाहीत तर त्यांनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडले."[२८]

'इंग्रजांनी उमाजीला पकडण्यासाठी १५ डिसेंवर १८२७ ला आपल्या अधिकाऱ्यांना सक्त ताकीद देत रामोशांचा त्वरीत वंदोवस्त करावा, वंड करणाऱ्यांना मोठी शिक्षा देण्यात येईल. बंडवाल्याची माहिती देणाऱ्यास वक्षीस देईल, अशी प्रलोभने दाखवली तसेच जनतेला वंडवाल्याशी चालणे-वोलणे वंद करण्याची तंवी दिली गेली. तरीही जनता घावरली नाही. उलट उमाजीने सहकार्य व आपल्या सैन्याच्या जोरावर अनेक इंग्रजांना गनिमी काव्याने यमसदनी पाठवले. २१ डिसेंवर १८३0 साली उमाजींनी तर आपला पाठलाग करणाऱ्या कॅप्टन वॉईड व त्यांच्या फलटणींला मांढरदेवी गडावरून वंदुका, गोफणी चालवून घायाळ करून परत पाठवले. काहीचे प्राण घेतले होते."[२९] शिवाय १६ फेवुवारी १८३१ रोजी इंग्रजी सत्तेविरोधात एक जाहिरनामाचा जाहिर करून इंग्रजांचा नाश (हत्या) करावा, इंग्रजी नोकऱ्या सोडाव्यात.

देशवासीयांनी एकाच वेळी एकत्र येऊन जागोजागी गोंधळ करून इंग्रजाविरोधात अराजकता माजवावी. इंग्रजांचे खजिने लूटून तो स्वत:साठी ठेवावा. इंग्रजांना शेतसारा, पट्टी देऊ नये. इंग्रजांची सत्ता लवकरच नष्ट होणार आहे. त्यांना कोणीही मदत करू नये. केल्यास त्यास नवीन सरकार शासन करेल असे सांगून एकप्रकारे स्वराज्याचा पुकारच केला, तेव्हाच उमाजी हा जनतेचा राजा वनला. या सर्व प्रकाराने इंग्रज गडवडले. त्यांनी उमाजीला पकडण्यासाठी युक्तीचा वापर केला. मोठमोठे सावकार, वतनदार यांना पैशाचे अमिष दाखवत फितूर केले तसेच उमाजीच्या सैन्यातील काहींना फितूर करण्याचा प्रयत्न केला. त्याचदरम्यान उमाजीच्या सैन्यातील काळोजी नाईक याने जाधव (साडवड) च्या एका स्त्रीला पळवून आणल्याने उमाजीने काळोजीचे हात छाटले. त्यामुळे हा काळोजी फितूर होऊन इंग्रजांना मिळाला. तसेच नाना चव्हाण ही फितूरं झाला. 'इंग्रजांनी उमाजीला पकडण्यास वक्षिस म्हणून ठेवलेल्या १० हजार रूपये व चारशे विघे जमीन मिळविण्यासाठी काळू नाईक व नाना चव्हाण उमाजीची सर्व गुप्त माहिती, ठिकाण इंग्रजांना सांगितले. १५ डिसेंबर १८३१ रोजी इंग्रजांनी भोर तालूक्यातील उतरोली या गावी एका झोपडीत उमाजीला वेसावध अवस्थेत रात्री पकडले. उमाजीवर देशद्रोहाचा खटला भरला व त्यास पुण्याच्या मामलेदार कचेरीत एका अंधाऱ्या खोलीत ठेवले होते. अशा या खोलीत असताना त्यास पकडणारा इंग्रज अधिकारी मोकळेपणाने दररोज महिनाभर त्याची माहिती घेत असे. उमाजीची माहिती लिहून ठेवली असून अशा उमाजीस इंग्रजांचे फिरते कोर्ट न्यायाधीश जेम्स यांनी दोषी ठरवून फाशीची शिक्षा सुनावली."[३०] "३ फेब्रुवारी १८३२ ला पुण्याच्या खडकमाळ आळी येथील कचेरीत वयाच्या ४१ वर्षी देशासाठी सर्वप्रथम उमाजी हसत-हसत फासावर चढला. इंग्रजाविरूद्ध प्रथम वंड करणारा उमाजी देशासाठी हुतात्मा झाला. या उमाजीचे प्रेत इंग्रजांनी इतरांना दहशत वसावी म्हणून पुणे मामलेदार कचेरीच्या वाहेर एका पिंपळाच्या झाडावर तीन दिवस लटकावून ठेवले होते. मात्र नंतर उमाजीच्या पत्नीने ते भिवंडीला नेऊन जमिनीत मातृभूमीच्या उदरात घातले. उमाजीवरोवर उमाजीचे साथीदार खुशावा नाईक व वापू यांनाही फाशी दिली."[३१] अशा धाडशी उमाजीनंतर तब्वल १३ वर्षांनी क्रांतीकारक वासुदेव वळवंत फडके जन्माला

आले. त्यांनी ३०० रामोशांना घेऊन १८५७ चे बंड केले. त्यावेळीही दौलती रामोशी हा त्या बंडाचा प्रमुख होता.

'मरावे परि कीर्तीरूपे उरावे' अशी उक्ती आहे. आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक यांच्याबद्दल ही उक्ती तंतोतंत जुळते. ते आपल्या कार्याने दीपस्तंभ ठरले आहेत. त्यांच्या कामगिरीचा गौरव करण्यास तेव्हांचे इंग्रज अधिकारीही स्वत:ला रोकू शकले नाहीत. इंग्रज अधिकारी रॉबर्ट सन याने १८२० ला ईस्ट इंडिया कंपनीला लिहिले होते की, उमाजीचा रामोशी-बेरड समाज इंग्रजाविरोधात तिरस्काराने पेटला असून तो कोणत्या तरी राजकीय बदलाची वाट पाहत आहे. जनता त्यांना मदत करत असून कोणी सांगावे हा उमाजी राजा होऊन छत्रपती शिवाजीसारखे राज्य स्थापणार नाही? तर कॅप्टन मोकीन टॉस म्हणतो उमाजीपुढे छत्रपती शिवरायांचा आदर्श होता. त्याला फाशी दिली नसती तर तो दुसरा शिवाजी झाला असता. हे केवळ गौरवोद्‌गार नाहीत... तर ते आहे... सत्य... जर इंग्रजांनी कूटनीती आखली नसती तर कदाचीत तेव्हांच स्वातंत्र्य लाभले असते.'[३२]

## २. हरी मकाजी नाईक :

'क्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या जीवन चरित्रावरून प्रेरणा घेऊन अनेक शूर लढवय्ये स्वातंत्र्य सेनानी तयार झाले. त्यापैकी एक वासुदेव बळवंत फडके त्यांनी १८५७ च्या उठावानंतर इंग्रजाविरूद्ध गनिमी कव्याने लढण्याचा निश्चय करून बंड उभे केले. ब्रिटिश प्रशासनाला मदत करणाऱ्या धनदांडग्यांना धडा शिकविण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रामध्ये फौज निर्माण करण्यासाठी त्यांनी रामोशी, महार, मातंग, कोळी, कुणबी, मराठा, चांभार, न्हावी, मुसलमान अशा विविध जाती धर्मातील लोकांना एकत्रित करून बंड उभे केले. यातील सर्वात मोठा सिंहाचा वाटा होता तो बेरड-रामोशी समाजाचा.'[३३]

महाराष्ट्राचे वैभव असलेले सह्याद्रीवरील गड किल्ले यांच्या संरक्षणाची जबाबदारी रामोशी समाजाकडे होती. परंतु इंग्रजांनी गड किल्ले, खालसा केल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ लागली. टोळीने संघटीत राहून दरोडा टाकायचा व आपली उपजीविका चालवायची असा रामोशी समाजाचा दिनक्रम चालू असताना क्रांतिवीर उमाजीने या दिनक्रमाला वेगळी वाट

दाखवून आशेचा किरण दाखविला. परंतु त्यांच्यानंतर रामोशी समाज जुन्याच वाटेने चालू लागला. इ.स. वी सन १८७७ च्या सुमारास फडकेंनी पुणे, सातारा, सांगली, सोलापूर परिसरातील रामोशी समाजाची चाचपणी करण्यास सुरूवात केली. एक बंड उभे केले. या बंडाची दिशा क्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या प्रमाणेच होती. ब्रिटिश शासनाला हादरविण्यासाठी धनदांडग्यांच्या घरावर दरोडे घालायचे आणि त्या पैशाचा उपयोग स्वातंत्र्यासाठी करायचा. या कार्यातील त्यांचे प्रमुख शिलेदार होते दौलतराव नाईक आणि हरी मकाजी नाईक होय. जिल्हा सातारा खटाव तालुक्यातील कळंवी गावाचा रहिवासी असलेला हरी धाडसी आणि शूरवीर होता. पूर्व कल्पना देऊन धाडसी वृत्तीने दरोडा घालणे ही त्यांची खासियत होती. त्यांच्यातील धाडसी वृत्ती आणि नेतृत्व गुण त्याला प्रवृत्त केले. क्रांतिवीर उमाजी नाईकांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करणे किती मोलाचे आहे याचे महत्त्व पटवून देण्यासाठी फडकेंनी वारंवार हरीच्या गाठीभेटी घेतल्या आणि त्याला स्वातंत्र्य संग्रामासाठी कार्य करण्याची गळ घातली. काम दरोडा घालण्याचेच होते परंतु ते देशसेवेसाठी करावयाचे होते व त्याची झळ गोरगरीब जनतेला बसू द्यायची नाही हे उद्दिष्ट समोर ठेवून फडकेंनी उभ्या केलेल्या बंडात तो सहभागी झाला.

'बंडाचे पहिले निशाण उभे केले ते २३ फेब्रुवारी १८७९ रोजी शिरूर जवळील धामरी गावातील ब्रिटिश प्रशासनासाठी काम करणाऱ्या मारवाड्यांच्या घरावर दरोडा टाकून तेथील कर्ज वचनचिठ्ठी आणि खतावण्या जाळून टाकल्या आणि गोरगरिब जनतेला सावकारी जखडातून मुक्त केले. त्यानंतर दावडी, निमगाव, पानमळा असे करीत जेजुरी जवळील वाल्हे गावामध्ये ५ मार्च १८७९रोजी मारवाड्यांच्या घरावर दरोडा टाकला. या सर्व प्रकाराने भयभीत झालेल्या इंग्रज सरकार कडून हरीला पकडून देणाऱ्यास अथवा माहिती कळविणाऱ्यास एक हजार इनाम जाहीर करण्यात आले. शेवटी वाम मार्गावर चालणाऱ्या हरीने देशासाठी आपला मार्ग बदलला आणि हौतात्म्य स्विकारले.'[३४]

## ३. बहिर्जी नाईक :

'बहिर्जी नाईक हे मराठ्यांच्या इतिहासातील एका महानायकाचं नाव. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या स्वराज्याची शपथ रायरेश्वराच्या मंदिरात घेतली त्या स्वराज्याच्या

सुरूवातीपासून ते महाराजांच्या निधनापर्यंतचा साक्षीदार म्हणजेच वहिर्जी नाईक होते. वहिर्जी जाधव नाईक हा बहिर्जी नाईक या नावाने प्रसिद्ध असणारा शिवाजी महाराजांचा सुप्रसिद्ध हेर होता. याच्या बातमी वरून शिवाजी महाराजांनी ४ आक्टोंवर १६७० रोजी सुरत लुटली. त्यामध्ये ४५ कोटी होन व ४ हजार घोडी शिवाजी राजांनी मिळवली होती.'[३५]

दिवसभर वहुरूप्याचे खेळ करून पोट भरवणारे वहिर्जी एकदा राजे मोहिमेवरती असताना त्यांना भेटले. महाराजांनी त्यांच्यातील कसव ओळखली, नाईक स्वराज्य निर्मितीच्या कामाला हिरा आहेत हे राजांनी ओळखले आणि तात्काळ त्यांना त्या कामात रूजू करून घेतले. शिवाजी महाराज हे नेहमी आपल्या माणसांतील गुण ओळखून त्यांना कामे वाटत असत. बहिर्जी नाईक कुणाच्याही नकला, वेशांतर करायला अगदी पटाईत होते. तसेच ते बोलण्यातही हुशार होते. त्यामुळे राजांनी त्यांना गुप्तहेर खात्यात रूजू करून घेतले.

'वहिर्जी नाईक यांचे गुण सांगायचे ठरले तर अंगात स्फुरण आल्याशिवाय राहणार नाही. नाईक हे महाराजांच्या गुप्तहेर खात्याचे प्रमुख होते. फकिर, वासुदेव, कोळी, भिकारी, संत अगदी कुठलेही वेशांतर करण्यात ते पटाईत होते. पण फक्त वेशांतर नाही तर समोरच्या माणसाच्या नकळत त्याच्या तोंडातून शव्द चोरण्याचं चातुर्थ त्यांच्याकडे होतं. ह्यात सर्वात मोठं आश्चर्य हे कि विजापूरचा आदिलशहा आणि दिल्लीचा वादशहा ह्यांच्या महालात वेशांतर करून आत व स्वत: आदिलशहा व वादशहा कडून ते पक्कि माहिती घेऊन येत. हेर असल्याचा संशय जरी आला तरी कत्तल करणारे हे दोन्ही वादशहा नाईकांना एकदा देखील पकडू शकले नाहीत यातच त्यांची वुद्धीमत्ता व चातुर्य दिसून येते.'[३६]

'महाराजांच्या गुप्तहेर खात्यात जवळजवळ तिन ते चार हजार गुप्तहेर असायचे. ह्या सर्वांचे नेतृत्व नाईकांकडे होतं. हे सर्व गुप्तहेर नाईकांनी विजापूर, दिल्ली, कर्नाटक, पुणे इत्यादी शहरात अगदी हुशारीने पसरवले होते. चुकीची माहिती देणाऱ्यास कडेलोट हा पर्याय नाईकांनी ठेवला होता. त्यांनी गुप्तहेर खात्याची जणूकाही एक भाषाच तयार केली होती. ती भाषा फक्त नाईकांच्या गुप्तहेरांना कळे. त्यात पक्षांचे आवाज असे. कुणालाही संदेश द्यायचा असल्यास त्या भाषेत दिला जाई. महाराज आज कुठल्या मोहिमेवर जाणार आहेत हे

सर्वात आधी नाईकांना माहित असायचं. त्याठिकाणची खडानखडा माहिती बहिर्जी नाईक काढत व महाराजांपर्यंत लवकरात लवकर पोहचवीत.'[३७]

असं म्हटलं जात कि, महाराजांच्या दरबारात नाईक जर वेशांतर करून आलेले असले तर ते फक्त महाराजांनाच ओळखायचे थोडक्यात दरबारात बहिर्जी नाईक नावाचा इसम नाहिच अशी सर्वांची समजुत असायची. ते फक्त गुप्तहेरच नाही तर लढवय्ये देखील होते. तलवारबाजीत-दांडपट्टयात ते माहिर होते. कारण गुप्तहेरांना कधीही कुठल्याही प्रसंगाला सामोरे जावे लागेल हे त्यांना माहित होते. कुठल्याही घटनेचा ते खूप बारकाईने विचार करी. शत्रूचे गुप्तहेर कोण? ते काय करतात? ह्यांची देखील माहिती ते ठेवत. तसेच त्यांच्याकडे एखादी अफवा पसरवायची असल्यास किंवा शत्रूला चुकीची माहिती पुरवायची असल्यास ते काम चतुराईने करीत. फक्त शत्रुच्याच प्रदेशाची नाही तर महाराजांच्या स्वराज्याची देखील पूर्ण माहिती ते ठेवत.

'शिवाजी राजे व शंभु राजे जेव्हा दिल्लीच्या बादशहाच्या वाढदिवसाच्या दिवशी त्याला भेटायला गेले असताना त्या आधीच दिल्लीत नाईकांचे गुप्तहेर दाखल झाले होते. कारण महाराजांना काही दगा फटका होऊ नाही ह्यांची त्यांनी पूर्ण काळजी घेतली होती. त्यासाठी त्यांनी आपले साडे चारशे गुप्तहेर वेगवेगळया वेशात दिल्लीच्या कानाकोपऱ्यात लपवले होते. आणि तेही महाराजांच्या येणाच्या महिनाभर अगोदर केले. हा एकच प्रसंग परंतु महाराजांच्या आयुष्यातील प्रत्येक घटनेत गुप्तहेर म्हणून त्यांचा सहभाग असायचा. त्यात अफजलखानाचा वध, पन्हाळयावरून सुटका, शाईस्तेखानाची बोटे तोडणे, पुरंदरचा वेढा किंवा सुरतेची लुट असो प्रत्येक प्रसंगात बहिर्जी नाईक महाराजांचे अर्धे काम पूर्ण करत असत. ह्या प्रत्येक घटनेत नाईकांनी शत्रूची इत्यंभुत माहिती महाराजांना दिली. बऱ्याच वेळा महाराज बहिर्जींनी दिलेल्या सल्ल्यांचा विचार करून पाऊल टाकत असत. राज्याभिषेक करताना महाराजांनी ज्या अष्ट मंडळाची निर्मिती केली होती त्यात गुप्तहेर खातं तयार करण्यात आलं होतं. तेव्हा देखील बहिर्जी नाईक त्या खात्याचे प्रमुख होते.'[३८]

## ४. हिरोजी फर्जद :

'हिरोजी फर्जद हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील महत्त्वाच्या गुप्तहेरांपैकी एक गुप्तहेर होय. सन ११ जून १६६५ च्या तहानूसार छत्रपती शिवाजीराजे औरंगजेबास भेटण्यासाठी आग्र्यास रवाना झाले. औरंगजेबाच्या पन्नासाव्या वाढदिवसासाठी राजे औरंगजेबाच्या दरबारात हजर झाले. पण औरंगजेबने दरबारात राजेंचा अपमान केला तसेच त्यांच्या निवासस्थानाभोवती पोलादखानाचे पहारे बसविले. स्वत: छत्रपती शिवराय आणि युवराज, संभाजीराजे कैदेत अडकल्यामुळे स्वराज्यावर मोठे संकट उभे राहिले होते.'[३९]

'छत्रपती शिवरायांनी आपल्या चतुराईने संभाजी राजेंना मोघलांची मनसबदारी मिळवून दिली त्यामुळे संभाजीराजे मुक्तपणे संचार करू शकत होते. तसेच हिरोजी फर्जद व मदारी म्हेतर यांस राजेंनी आपल्यासोबत ठेवून आपल्या सोबतच्या इतर मावळयांना बाहेर पाठविले. संभाजीराजेंना मनसबदारी मिळाल्यामुळे त्यांनी राजेंच्या सुटकेसाठी प्रयत्न चालू केले. संभाजीराजेंनी मावळयांना आग्र्याच्या बाहेर ठिकठिकाणी तैनात ठेवले. छत्रपती शिवरायांनी आजारी पडण्याची युक्ती करून आपली तब्येत चांगली व्हावी म्हणून आग्र्यातील मंदिर, मशिदी, गोरगरिब जनतेला मिठाईचे पेटारे पाठवावयास सुरूवात केली. सुरूवातीस पोलादखानाचे सैन्य पेटारे काळजीने तपासत होते. पण नंतर ते पेटारे तपासण्यास कुचराई करू लागले. अखेरीस संधी साधून दि.१७ ऑगस्ट १६६६ ला राजे वेशांतर करून पेटारे घेऊन निघून गेले.'[४०] (राजे आग्र्यातून कसे निसटले याबद्दल इतिहासकारांमध्ये वादविवाद आहेत.) राजेंच्या शामियान्यात हिरोजी फर्जद छत्रपतींचे कपडे घालुन झोपला. या घटनेचे वर्णन सभासदाच्या बखरीमध्ये पुढीलप्रमाणे आहे.

'हिरोजी फर्जद पलंगावरी निजला होता. तो चार प्रहर व तीन प्रहर दिवस तैसाच निजला. चौकीचे पोलादखानाचे लोक कोठडीत येऊन पाहतात, तो राजे शेला पांघरून निजलेले. पोर पाय रगडित होता. पोरास लोक पुसतात की राजे आज फार वेळ निजले? पोर म्हणतो की, "शीर दुखते" ऐसे पाहोन लोक जातात. तैसाच तीन प्रहर रोज हिरोज निजला होता. तो प्रहर दिवस असता हिरोजी उठोन, आपली पांघरणे, चोळणा, मुंडासे घालून पोर

बरोबरी घेऊन, वाहेर आला, चौकीदारास पुसिले त्यास हिरोजीने सांगितले की शीर दुखते, कोणी कोठडीत जाऊ लागेल त्यास मना करणे. आपण औषध घेऊन येतो. म्हणून चौकीदारास सांगून दोघे वाहेर गेले. रामसिंगाचे गोटास जाऊन त्यास एकांती वर्तमान सांगोन आपण तेथून निघोन देशाचा मार्ग धरिला. संभाजीराजे, फिरोजी फर्जद, मदारी म्हेतर यांच्यामुळे राजे सुखरूप औरंगजेवाच्या तावडीतून निसटले.'[४१]

## ५.कोंडाजी फर्जद :

अवघ्या साठ मावळयानिशी पन्हाळगड ताव्यात घेणारा पराक्रमी वीर हा कोंडाजी होय. तुंगभद्रेपासून उत्तरेस अहिवंतापर्यंत अनेक गड राजांनी ताब्यात घेतले होते. दख्खनचा दरवाजा असलेला पन्हाळगड त्यांना ताब्यात मिळाला नव्हता. राजेंनी दि.६ जून १७७२ रोजी रायगडावर आपल्या सहकाऱ्यांना ही सल बोलून दाखविली. यावेळी कोंडाजी फर्जद राजेंना बोलिला की गड म्या घेतो. त्याने अवघे तीनशे हशम (मावळे) राजेंकडे मागितले. अवघ्या तीनशे मावळयानिशी पन्हाळगड जिंकावयास निघालेल्या कोंडाजीचे राजेंनी कौतुक करून त्यास सोन्याचे कडे दिधले. कोंडाजीने कोकणातून महाडमार्गे येऊन राजापुरास आपला तळ टाकला. राजापूर व पन्हाळा किल्ला हे अंतर आडवाटेने (जंगली रस्त्याने) अंदाजे ८०-९० कि.मी.होते. हेरगिरीने वेष पालटून गडावर जाऊन त्यांनी गडाची पूर्ण माहिती काढली. गडावर अंदाजे दोन हजार गनिम होते. वाबूखान हा आदिलशाही किल्लेदार होता.

'फाल्गुन वद्य त्रयोदशी (दि.६ मार्च १६७३) रोजी मध्यरात्री राजापुरातून येऊन फिरंगोजी गडाच्या जवळ पोहोचला. तीनशे मावळयापैकी त्यांनी निवडक साठ मावळे घेऊन गडावर हल्ला केला. तीन दरवाज्याजवळ असलेल्या कडयावरून चढून त्यांनी गडावर प्रवेश केला. मध्यरात्री मराठे गडावर आल्यावर त्यांनी कापाकापीला सुरूवात केली. गडाचा किल्लेदार कोंडाजीच्या तलवारीच्या वारात वावूखानाचे मस्तक धडावेगळे झाले. किल्लेदार पडल्यामुळे खानाच्या सैन्यात गोंधळ उडाला. ते पळून जाऊ लागले. पण गडावरील साठ मावळयांनी त्यांची दाणादाण उडवून गड ताव्यात घेतला. अवघ्या साठ मावळयांनिशी गड ताब्यात घेणारा कोंडाजी खरोखरच वीर होता.'[४२]

## ६ . डॉ . गस्ती भिमराव :

'बेळगाव जिल्ह्यातील यमनापूर या गावी बेरड रामोशी समाजात डॉ . भिमराव गस्ती यांचा जन्म झाला . बेरड रामोशी सेवा समितीचे अध्यक्ष व जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व साहित्यिक म्हणून ते प्रसिद्ध आहेत . जवळजवळ पस्तीस वर्षे एका विशिष्ट क्षेत्रात समाजातील दुर्लक्षित घटकांच्या उन्नयनाचा ते प्रयत्न करीत आहे . अवहेलनेच्या कचाट्यात सापडलेल्या बांधवांना समस्यायुक्त आणि सुस्थिर जीवनाचा लाभ करून देणे हे त्यांच्या प्रयत्नाचे मुख्य उद्दिष्ट आहे . त्यामुळे त्यांनी महात्मा जोतिबा फुले, महामानव डॉ . बाबासाहेब आंबेडकर यासारख्या महापुरूषांनी प्रशस्त केलेल्या आत्मोन्नतीसाठीच्या चळवळीचा हा मार्ग म्हणून त्या प्रयत्नामागची त्यांची प्रेरणा आहे . आणि या प्रेरणेतूनच त्यांनी तात्विक चिंतन, वैचारिक मंथन इ . पेक्षा प्रत्यक्ष कृतीवर भर दिलेला आहे .'[४३]

बहुतांश निरक्षर आणि अडाणी असलेल्या समाजाच्या कपाळावर गुन्हेगारी जमातीचा शिक्का असल्याने दिवसातून तीनदा पोलीस ठाण्यावर हजेरी देण्याचे बंधन, तरीही कुठेही चोरी-दरोडेखोरी झाली तर पोलिस पुरूष मंडळींना उचलून नेत कमालीचे दारिद्र्य हे या समाजाचे प्राक्तन होते . अज्ञान तर इतके की, अन्यायाची खंत वाटण्याऐवजी हेच आपले नशीब आहे . अशा समजुतीने पिढ्यानपिढ्यापासून मनात घर केलेले तरीही अशा अवस्थेत त्यांची उच्च शिक्षण प्राप्त केले . शिक्षणाच्या निमित्ताने जसजसे विस्तृत क्षेत्रात वावरणे, निरीक्षण करणे इ . सुरू झाले तसतशी या अन्याय ग्रस्ततेची बोच तीव्रपणे जाणवू लागली . स्वत: अशिक्षित असलेल्या त्यांच्या वडिलांनी त्यांना शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले . तसेच ते हुशार असल्याने शिक्षणात कुठेच खंड पडला नाही . प्रत्येक टप्प्यावर उत्तम प्राविण्य संपादित केल्यामुळे त्यांना शिष्यवृत्ती मिळत गेली आणि त्यांनी पीएच . डी . पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले .

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सुमारे एक वर्ष त्यांनी नॅशनल जिऑलॉजिकल रिसर्च सेंटरमध्ये रिसर्च असिस्टिंट म्हणून काम केले . परंतु याच दरम्यान त्यांच्या मनात मात्र वेगळीच उलथा पालथ सुरू झाली होती . ज्या समाजघटकातून ते पुढे आले त्याची दयनीय अवस्था त्यांना

स्वस्थ बसू देत नव्हती. दारिद्र्य आणि अज्ञान यांनी गांजलेला, सतत अत्याचार सहन करणारा पिढ्यांपासून पोलिसी अन्यायाचा जाच सहन करणारा, अस्थिर शोषित, दुर्लक्षित, तुच्छतेने जीवन जगणारा आपला बांधव त्याचे उन्नयन करण्याची जबाबदारी आपलीच नाही का? आपली बुद्धीमता, शिक्षणामुळे मिळालेली सामाजिक प्रतिष्ठा यांचा उपयोग केवळ व्यक्तिगत प्रगती-समृद्धीसाठीं करण्याचा आपल्याला काय अधिकार? यासारखे प्रश्न त्यांना सतावू लागले.

हैद्राबादच्या वास्तव्यात तेथील 'गीता आश्रमाशी' त्यांचा संबंध आला होता. त्याच्याच माध्यमातून रा.स्व संघाशी परिचय झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, म.फुले, इत्यादिंच्या कार्याचा व कर्तृत्वाचा परिचयही याच काळात झाला. या साऱ्यांचा परिणाम अन्यायाविरूद्ध लढा द्यायचा असेल तर पहिला सैनिक आपणच व्हायला हवे आणि सेनापतीची भूमिका घेऊन सामाजिक चळवळीचे नेतृत्व ही आपणच करायला हवे याची खूणगाठ मनात रूजली मनाचा निश्चय झाला आणि चांगल्या पगाराची नोकरी सोडून त्यांनी चळवळीत उडी टाकली.

## पहिला यशस्वी लढा :

'१९६६ साली एका कंपनीने (इंडाल) बेळगावच्या आसपासच्या परिसरातून सुमारे १६00 एकर जमीन संपादन केली होती. त्या १६00 एकरात त्यांचा भला मोठा अल्युमिनियमचा प्रकल्प उभा राहू लागला. परंतु त्याचा फारसा मोबदला लोकांना मिळाला नव्हता. शेती हेच रोजीरोटीचे साधन होते व तेही हिरावून घेतले गेल्यामुळे बेरोजगारी व उपासमारीची पाळी बेरड लोकांवर आली होती. समाज असंघटित असल्यामुळे या अन्यायाविरोधात कोणी आवाजही उठवत नव्हते. हाच प्रश्न हाती घेऊन डॉ.भिमराव गस्ती यांनी समाज संघटित करायला सुरूवात केली. त्यांच्यावर झालेल्या अन्यायाची व त्याच्या तीव्र परिणामांची त्यांना त्यांनी जाणीव करून दिली. ज्यांच्यावर अन्याय होतो त्याला होणाऱ्या अन्यायाची जाणीव उत्पन्न करणे हे त्यांच्या समोरचे पहिले आव्हान होते. हा प्रश्न थेट पोटाशी जोडलेला असल्यामुळे त्यांची हाक लोकांच्या हृदयाला भिडली व चळवळ उभी करणे शक्य झाले. त्या कारखान्यामुळे विस्थापीत झालेल्या अनपढ लोकांना कोणी काम देण्यास तयार नव्हता. त्या कारखान्यात काम मिळावे म्हणून त्यांनी लढा उभा केला. या लढ्यामुळे समाजाचे सर्व अन्यायग्रस्त घटक

समाविष्ट झाले होते. त्या चळवळीतील विधायकतेमुळे यश मिळत गेले. सुमारे १३00 लोकांना काम मिळाले. शेकडो कुटुंबांना नुकसान भरपाई मिळाली. एक लढा यशस्वी झाला.'[४४]

यानंतर डॉ.भिमराव गस्तींनी अनेक मोर्चे काढले. अनेक ठिकाणी चळवळी उभ्या केल्या. काही वेळेला त्यांना तुरूंगवासही भोगावा लागलेला आहे. बदलत्या काळानुसार त्यांच्या चळवळींचे स्वरूप ही बदलत गेले. प्रकल्पग्रस्त, डोंगराळ भागातील वस्ती, स्त्रिया यांच्या प्रश्नांचे स्वरूप वेगवेगळे होते. त्यामुळे त्यांच्या चळवळीचे स्वरूपही वेगळे राहिले. उत्तर कर्नाटक, कोल्हापूर व सांगली येथे या समाजाची संख्या मोठी होती. त्यामुळे जमिनीचे लढे या भागात लढले गेले. कोल्हापूर जिल्ह्यात याचे प्रमाण सर्वात जास्त होते. एका बाजूला पोलिसी अत्याचारापासून मुक्ती व दुसऱ्या बाजूला रोजगार मिळवून देणे अशा दुहेरी पद्धतीने ही चळवळ त्यांनी पुढे नेली.

'१९७५ च्या जून महिन्यात देशात आणिबाणी लागू झाली. वास्तविक ते सामाजिक चळवळीत होते परंतु कोणत्याही राजकीय पक्षाशी व राजकारणाशी संबंधित नव्हते. तरी देखील त्यांच्या सामाजिक चळवळीमुळे त्यांना अटक झाली. १९ महिने गुलबर्गा येथे त्यांना कारावास घडला. १९७७ साली त्यांची कारावासातून सूटका झाली आणि त्यानंतर खऱ्या अर्थाने त्यांची सामाजिक चळवळ उभी राहिली.'[४५] त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या बेरड समुदायाविषयीच्या चळवळी केलेल्या आहेत त्यामध्ये पुढील चळवळींचा समावेश होतो.

१८८३ पासून बेरड समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्यासंबंधीची यशस्वी चळवळ २.देवदासींच्या पुनर्वसनासंबंधीची चळवळ ३.नवल तीर्थचे देवदासी शिबीर ४.नेसरीची चळवळ ५.चंदगडचा मोर्चा ६.जमिन गिळणाऱ्या कारखान्याविषयीची चळवळ ७.बेळगाव परिषद ८.जागृती मोर्चा आणि दारू गाळणे परवानगी मोर्चा ९.जमिनदाराविषयीची चळवळ १0.दड्डीचे शिबीर ११.पदयात्रा १२.उत्थान ची स्थापना इ.

त्यांच्या चळवळीचा पहिला टप्पा पोलिसी त्रास थांबविणे. दुसरा टप्पा त्यांच्यातील जातपंचायत मोडून काढणे आणि पोरांचे प्रश्न सोडविणे. त्यानंतर तिसरा टप्पा म्हणजे

शिक्षण. त्यांची चळवळ लोकांच्या प्रश्नाभोवतीच फिरत राहिली, यामुळे त्यांच्या चळवळीला अभूतपूर्व यश मिळत गेले.

## ३.६. बेरड ही देशभक्तच :

'कर्नाटकातील कित्तूरची राणी चन्नम्मा ही मूळची काकतीच्या देसाई घराण्याची. काकतीच्या डोंगरात बेरड लोकांच्या प्रामुख्याने लोकवस्त्या आहेत. बेळगाव, हुक्केरी, गोकाक व बैलहोंगल तालूक्यात हीच जमात मोठ्या संख्येने आहे. कित्तूर संस्थानच्या स्वातंत्र्यलढ्यात याच बेरड जमातीच्या हजारो सैनिकांनी आपले बलिदान दिलेले आहे. यामध्ये चिकलदिन्नीचा गुडदाप्पा नाईक हा एक बेरडांचा प्रमुख सरदार त्याला स्वातंत्र्यलढ्यात वीरमरण आले. संगोळी रायण्णांचे साथीदार प्रामुख्याने बेरडच होते. यामध्ये यल्लाप्पा नाईक, सूतकट्टीचे मल्लाप्पा नाईक, वाळाप्पा नाईक, बेळवडीचे साताप्पा नाईक, गिऱ्याप्पा नाईक, कऱ्याप्पा तळवात, संगोळीचे दोड वाळाप्पा नाईक, संगाना नाईक असे शेकडो बेरड क्रांतिकारकांनी कित्तूर संस्थानाचा स्वातंत्र्यलढा गाजविला.'[४६]

'या सर्वांना संगोळी रायण्णांबरोबरच चंदगड येथे १८३० मध्ये इंग्रजांनी फाशी दिली, असा इतिहास आहे. इंग्रजांच्या राज्यकारभारात बेरड मंडळी सातत्याने आड येत होती म्हणून इंग्रजांनी बेरडांचा बंदोबस्त करण्यासाठी त्यांच्या माथ्यावर गुन्हेगारीचा शिक्का मारला व तब्बल दिडशे वर्षे वेगवेगळे कायदे करून त्यांना छळत राहिले. तरीही बेरडांनी स्वातंत्र्य मिळेपर्यंत देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात हिरिरीने भाग घेऊन झुंज दिली.'[४७]

## <u>संदर्भ ग्रंथ सूची :</u>


१. समरसता साहित्य परिषदेचे एकता मासिक, फेब्रुवारी, २००६ पृ.क्र.१५.

२. कित्ता, पृष्ठ क्र.१६.

३. कित्ता, पृष्ठ क्र.१७.

४. कित्ता, पृष्ठ क्र.१९.

५. गस्ती भीमराव, 'बेरड' पराख प्रकाशन, बेळगाव (१९८७), कित्ता, पृष्ठ क्र.८६.

६. कित्ता, पृष्ठ क्र.९५.

७. कालेलकर गोविंद मंगेश, 'मुंबई इलाख्यातील जाती' वरदा प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती, १९९९ पृ.क्र.१३६.

८. जोशी महादेव शास्त्री (संपादक) , 'भारतीय संस्कृती कोश खंड ६ (वंगाल ते मराठी भाषा साहित्य) पुणे, पृष्ठ क्र.२२५.

९. कित्ता, पृष्ठ क्र.२२५

१०. कित्ता, पृष्ठ क्र.२२५

११. कित्ता, पृष्ठ क्र.२२६

१२. कालेलकर गोविंद मंगेश, 'मुंबई इलाख्यातील जाती' उपरिनिर्दिष्ट, पृ.क्र.१३६.

१३. जोशी महादेव शास्त्री (संपादक) , 'भारतीय संस्कृती कोश खंड ६ उपरिनिर्दिष्ट, पृ.क्र.२१८

१४. कित्ता, पृष्ठ क्र.२१९

१५. कित्ता, पृष्ठ क्र.२१९


१६. कित्ता, पृष्ठ क्र.२२०

१७. कित्ता, पृष्ठ क्र.२२१

१८. जोशी महादेवी शास्त्री (संपादक) , 'भारतीय संस्कृती कोश खंड ८ (राजस्थान ते विवाह) पुणे, ३१ ऑगस्ट, १९७४, पृष्ठ क्र.१९९.


१९. कित्ता, पृष्ठ क्र.११९

## कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालूक्याचे स्थान





चंदगड तालुका

## चंदगड तालुक्यातील माणगांव खेडयाचे स्थान





माणगांव खेडे

## भारतातील महाराष्ट्र राज्याचे स्थान



## महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्याचे स्थान




कोल्हापूर जिल्हा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

२०. कित्ता, पृष्ठ क्र.२००

२१. कित्ता, पृष्ठ क्र.२००

२२. कालेलकर गोविंद मंगेश, 'मुंबई इलाख्यातील जाती' उपरिनिष्टि, पृ.क्र.१३७.

२३. कित्ता, पृष्ठ क्र.१३८

२४. दै.वृत्तपत्र 'पुण्यनगरी', कोल्हापूर बुधवार ३ फेब्रुवारी-२०१०, पृ.क्र.६

२५. मराठी विश्वचरित्र कोश, खंड २ (घई, सुभाष ते प्यासॉ, सिमेऑ देनिस) विश्वचरित्र संशोधन केंद्र गोवा, १७ सप्टेंबर १९७७, पृष्ठ क्र.६५४.

२६. दै.वृत्तपत्र 'पुण्यनगरी', कोल्हापूर बुधवार ३ फेब्रुवारी-२०१०, पृ.क्र.६

२७. कित्ता, पृष्ठ क्र.६

२८. कित्ता, पृष्ठ क्र.६

२९. htpp://www.marathimandali.com

३०. कित्ता

३१. कित्ता

३२. दै.वृत्तपत्र 'पुण्यनगरी', कोल्हापूर बुधवार ३ फेब्रुवारी-२०१०, पृष्ठ क्र.६

३३. htpp://www.marathiadda.com

३४. कित्ता

३५. भारत वर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश, (मौर्य चंद्रगुप्तापासून ते पेशवाई अखेर, ख्रि.पूर्व ३२१ ते इ.स.१८१८), सिद्धेश्वर शास्त्री चित्राव १९३७ पृष्ठ क्र.५४४

३६. htpp://www.marathiadda.com

३७. कित्ता

३८. कित्ता

३९. htpp://www.marathdesha.com

४०. कित्ता

४१. कित्ता

४२. कित्ता

४३. दिवाळी अंक 'वीरवाणी', २०१०, पृष्ठ क्र.१३२.

४४. कित्ता, पृष्ठ क्र.३६

४५. कित्ता, पृष्ठ क्र.३८

४६. दै.सकाळ, कोल्हापूर, शनिवार ५ ऑगस्ट, २००६, पृष्ठ क्र.३

४७. कित्ता, पृष्ठ क्र.३